नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# चंद्रपूर महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ४६ * अंक ९ * * चंद्रपूर * | बुधवार, दिनांक ०९ जुलै २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## शूटरला शस्त्र देणाऱ्या गुन्हेगाराचा एन्काउंटर

■ वृत्तसंस्था, पाटणा, दि. ८ :
पाटणा शहरातील मालसलामी परिसरात मंगळवारी पहाटे ४ वाजता झालेल्या चकमकीत एका गुन्हेगाराचा मृत्यू झाला. बिहारमधील मोठे उद्योगपती गोपाल खेमका यांच्या हत्येप्रकरणी चौकशीसाठी पोलिस विकास उर्फ राजा याच्या घरी पोहोचले होते.

दरम्यान, राजाने पोलिसांवर गोळीबार सुरू केला. पोलिसांनी केलेल्या प्रत्युत्तरात विकास मारला गेला. पाटण्याचे एसएसपी कार्तिकेय शर्मा म्हणाले- 'ही चकमक पहाटे ४ वाजता झाली. राजाचा खेमका हत्या प्रकरणाशी काय संबंध आहे हे अद्याप उघड झालेले नाही.' राजाविरुद्ध अनेक गुन्हे दाखल होते. त्याचे नाव अनेक खूनांमध्ये आले होते.

अग्रलेख

## खरीखरी..

### शेतकऱ्यांच्या आत्महत्या कधी थांबतील

जीव देणे ही काही साधी गोष्ट नाही. जीव घेणे हे त्या मानाने सोपे आहे. म्हणजेच जीव देणे अत्यंत अवघड आहे. आज विधान सभेमध्ये मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांमध्ये आत्महत्यांचे प्रमाण वाढल्याची माहिती देताना मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी मराठवाड्यातील आत्महत्येची जंत्री मांडली. आजपर्यंत विदर्भात आत्महत्येचे प्रमाण फार मोठे होते. आता विदर्भाप्रमाणेच मराठवाड्यातही आत्महत्येचे प्रमाण वाढलेले आहे. विदभार्पाठोपाठ आता मराठवाडाही शेतकऱ्यांच्या आत्महत्यांनी ढवळून निघालेला दिसतो. एकूणच शेतकऱ्यांची परिस्थिती आज अतिशय बिकट झालेली आहे. शेतकऱ्यांच्या मूळ प्रश्नाबाबत जोपर्यंत गंभीरपणे निर्णय सरकारकडून होत नाही. तोपर्यंत या आत्महत्या अशाच चालू राहणार आहेत. अमेरिकेतील शेतकरी भारतातील शेतकऱ्यांपेक्षा १०० पट श्रीमंत आहेत. त्याचे कारण त्या ठिकाणचे लहान लहान शेतकरी किमान शंभर ते कमाल ५०० एकर जमीन बाळगून आहेत. अमेरिकेच्या सरकारकडून शेतकऱ्याला भरघोस सवलती आणि वेगवेगळ्या पद्धतीने मदत मिळत असते. खते, बी-बियाणे कीटकनाशके यांसह शेतीसाठी लागणाऱ्या नवनवीन अत्याधुनिक उपकरणांसाठी अमेरिका शेतकऱ्याला सढळ हस्ते मदत करीत असते. आपले नितीन गडकरी म्हणतात की, अमेरिकेचे रस्ते अतिउत्तम आहेत. म्हणून अमेरिका श्रीमंत आहे. परंतु आम्हाला तर असे वाटते की, अमेरिका सधन आणि श्रीमंत आहे. त्याचे कारण अमेरिकेतील शेतकरी श्रीमंत आहेत. अमेरिकेच्या शेतकऱ्याला कोणत्याही गोष्टीची ददात नसते. अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेत शेतकरी हा महत्त्वाचा घटक आहे. अमेरिकेचे सरकार जाणते की, शेतकरी आहेत. म्हणून आपले पोट भरते आहे. ही बाब आपल्या सरकारलाही समजते. पण त्यांना उमगत नाही हीच खरी गोम आहे. आपल्या इथे विशेषता महाराष्ट्रात तर शेतकऱ्यांना कोणतीही सवलत द्यायचीच नाही. उलट शेतकऱ्याला जास्त भाव मिळत असेल. तर तो कसा पाडायचा. याचेच आडाखे आखले जातात आणि हीच खरी शोकांतिका आहे. सरकार कोणतेही असले किंवा कोणाचेही असले. तरी आपल्या इथली सरकारे शेतकऱ्यांच्या शत्रूसारखे काम करतात. हे अढळ आणि निर्विवाद सत्य आहे. हे सत्य मान्य केले पाहिजे. म्हणजे शेतकऱ्यांच्या आत्महत्या का होतात. हे आपोआपच समजून येईल. कोणीही कितीही आरोप करा, कोणीही कितीही बोंबा मारा. घसा कोरडा होईपर्यंत भाषणे करा. मोर्चे काढा, आंदोलने करा. त्याच्या बदल्यात भारतातील म्हणजेच विशेषता महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या पदरात फक्त आणि फक्त आत्महत्येचीच भीक घातली जाते. जे आत्महत्या करतात ते सुटतात आणि त्यांचे कुटुंब नरकवास भोगते. अनेक सरकारांनी पोसलेल्या बड्याबड्या उद्योगपतींचा स्वर्ग या धरतीवरच आहे आणि पिढ्यान्पिढ्या कष्ट करणाऱ्या सामान्य शेतकऱ्याचा नरकही इथेच आहे. ही विषमता एके दिवशी आपल्या देशाला रसातळाला घेऊन जाईल. विदर्भातील आत्महत्येचे लोण मराठवाड्यात पोहोचले आहे. हे जाहीर करताना आपण किती निगरगट्ट झालो आहोत, तेच दिसते. कोणे एकेकाळी विदर्भ म्हणजे वऱ्हाड आणि वऱ्हाड म्हणजे सोन्याची कुऱ्हाड असे म्हणत असत. आता तीच कुऱ्हाड लोखंडाची झालेली आहे. त्याच कुऱ्हाडीला शासनाच्या उदासीनतेमुळे गंज म्हणजेच जंग लागला आहे. हाच लागलेला जंग किंवा गंज शेतकऱ्यांच्या जीवाचे एक घाव दोन तुकडे करून टाकत आहे. मुंबईत राहणाऱ्या आपल्या राज्यकर्त्यांना आपले जुने दिवस विसरण्याची सवय आहे. बऱ्याचशा राजकारणाची शेती प्रचंड फायद्यात असते. त्याचे रहस्य सामान्य शेतकऱ्याला कसे काय बरे कळेल. यातून एक गोष्ट अत्यंत निर्विवादपणे सांगावीशी वाटते. ती म्हणजे आताचा शेतकरी बाजाराच्या हातातील खेळणे झालेला आहे. राज्यकर्त्यांसाठी शेतकरी म्हणजे गाजराची पुंगी आहे. ही गाजराची पुंगी वाजली तर वाजली. नाही तर मोडून खाऊन टाकली. अशी सध्याची स्थिती आहे. खरंतर आम्ही ज्या संवेदना व्यक्त केल्या. त्या कराव्याशा वाटल्या म्हणून केलेल्या आहेत. मात्र सध्या आमच्या संवेदना मेलेल्या आहेत आणि त्या जिवंत होण्याची शक्यताही आणि शाश्वतीही नाही. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी अश्रू ढाळणेही कुणाला जमत नाही आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्याही थांबत नाहीत.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## ७५ वर्षांत कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळाकडून

# संविधानाला अभिप्रेत कार्य

### सत्काराला उत्तर देताना सरन्यायाधीश भूषण गवई यांचे गौरवोद्गार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :
राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या आठवड्यातील दुसऱ्या दिवशी आज मंगळवारी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्यावतीने सरन्यायाधीश भूषण रामकृष्ण गवई यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी बोलताना सरन्यायाधीशांनी स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांत भारतीय लोकशाहीच्या तिन्ही स्तंभांनी अर्थात कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळाने संविधानाला अभिप्रेत असेच काम केल्याची भावना व्यक्त केली.

सरन्यायाधीश म्हणाले, एका घटनात्मक पदावर काम करताना मग तो सुप्रीम कोटार्चा न्यायाधीश असो की हायकोटार्चा न्यायाधीश असो, तुम्हाला या घटनेत नमूद मुलभूत अधिकार व मार्गदर्शक तत्वांनुसारच कार्य करणे अभिप्रेत असते.

बाबासाहेब नेहमीच म्हणायचे की, भारताची राज्यघटना ही देशात एक रक्तहिन क्रांती निर्माण करण्याचे साधन आहे. निश्चितच आपण ७५ वर्षांच्या कालखंड त्या दृष्टिकोनातून काम केले आहे. माज्या स्वतःविषयी सांगायचे तर, मला जेव्हा केव्हा संधी मिळाली तेव्हा तेव्हा मी मार्गदर्शक तत्वे व मुलभूत हक्क यांच्यात संतुलन साधण्याचा प्रयत्न केला आहे. ही तारेवरची कसरत असते. परंतु, मला हे पद या देशाची, समाजाची सेवा करण्याची मिळालेली संधी आहे. त्यानुसार न्यायदानात काम करण्याची संधी मिळाली तेव्हा मी ते करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला.



मागील २२ वर्षांच्या कालखंडात न्यायदानाचे चांगले काम करता आले. बाबासाहेब व घटनाकारांचे सामाजिक व आर्थिक समानता निर्माण करण्याचे एक स्वप्न होते. हे स्वप्न पूर्ण करण्याचा कार्यात एक खारीचा वाटा उचलण्याची मला संधी मिळाली. आज आपण सर्वांनी माझा बहुमान केला. हा बहुमान १२ कोटी ८७ लाख जनतेने दिलेला हा सन्मान आहे. मी या जनतेला वंदन करतो, असेही सरन्यायाधीश यावेळी बोलताना म्हणाले.

**बाबासाहेबांच्या कामगिरीवर भाष्य**

सरन्यायाधीश म्हणाले, ९ डिसेंबर १९४६ रोजी भारताच्या घटना समितीची बैठक झाली. त्यानंतर १३ डिसेंबर १९४६ रोजी पंडित जवाहरलाल नेहरू यांनी घटना समितीचे स्वरुप व व्याप्ती काय असेल याची माहिती दिली.

यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना बोलण्यासाठी आपला नंबर २-३ दिवसांनी येईल असे वाटले. पण त्यांना पहिल्याच दिवशी म्हणजे १३ डिसेंबर रोजीच बोलण्याची संधी देण्यात आली. त्यानंतर त्यांनी आपले मत विस्तृतपणे उपस्थितांना समजावून सांगितले.

**सरन्यायाधीशांत मानवता व संवेदनशीलता हा मोठा गुण**

मानवता व संवेदनशीलता हा त्यांचा स्वभावातील मोठा गुण आहे. महाराष्ट्रात मुंबई हायकोर्टात जज म्हणून काम करताना त्यांच्यापुढे अनेक अडचणीचे प्रसंग आले. एकीकडे कायदा, तर दुसरीकडे व्यापक जनहित होते. त्यावेळी त्यांनी त्या कायद्याचा अर्थ व्यापक जनहिताचा कसा काढता येईल यावर त्यांनी भर दिला. प्रत्येकवेळी सगळ्या गोष्टी कायद्याने होतात असे नाही, तर हे व्यापक जनहित त्यात बसवता येते, या विचाराने त्यांनी अनेक निर्णय दिले. या प्रकरणात लोकांत मोठा असंतोष निर्माण झाला असता. पण गवई यांनी त्यातूनही मार्ग काढण्याचा प्रयत्न केला, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. अनेकदा लोक न्यायाधीश झाले, सरन्यायाधीश झाले की कोषात जातात. पण भूषण गवई केव्हाच कोषात गेले नाही. ते सर्वांना नेहमी उपलब्ध राहतात. अगदी शेवटचा माणूस कुठे दिसला तर त्याच्याशी ते आपुलकीने संवाद साधतात. या सभागृहातील २५ टक्के लोक त्यांच्या परिचयाचे असतील, असे मत मुख्यमंत्री फडणवीस यांनी सरन्यायाधीशांच्या कौतुक सोहळ्यात व्यक्त केले.

**ज्याला कळले संविधान...**

सरन्यायाधीशांनी अनेक लँडमार्क निकाल दिले. त्यांची भाषा सौम्य असली तरी ते ठाम असतात. त्याचा दीपस्तंभासारखा उपयोग न्यायव्यवस्थेला झाला आहे.
ज्याला कळले संविधान... त्याचे सुटत नाही कधी भान,
ज्याचा असतो नेक इरादा.. त्यालाच कळतो खरा कायदा...
अशी चारोळीही एकनाथ शिंदे यांनी यावेळी सरन्यायाधीशांचे कौतुक करताना केली. त्यांची ही छोटेखानी कविता ऐकताच सभागृहात हशा पिकला. स्वतः सरन्यायाधीशही यावेळी खळखळून हसले. त्यावर शिंदे यांनी आपण केंद्रीय मंत्री रामदास आठवलेंची आठवण केल्याचे सांगितले. महाराष्ट्राला कर्तव्य कठोर न्यायाधीश रामशास्त्री प्रभुणे यांची परंपरा आहे. वारसा आहे. गवई साहेब यांच्या निवडीमुळे ही समृद्ध परंपरा पुढे जाईल असा विश्वास आपल्या सर्वांना आहे, असे मत शिंदे यांनी यावेळी व्यक्त केले.

**सरन्यायाधीशांपुढे मराठीचा मुद्दा**

अंबादास दानवे यांनी यावेळी मोठ्या खुबीने सरन्यायाधीशांपुढे मराठीचा मुद्दा मांडला. ते म्हणाले, सरन्यायाधीशांनी नुकतेच आपले प्राथमिक शिक्षण मराठी भाषेतून झाल्याचे सांगितले. त्यांच्या सांगण्याचा अर्थ हा आहे की, प्राथमिक शिक्षण मराठीत घेतल्यानंतरही या देशाच्या सर्वोच्च पदावर बसता येते हे भूषण गवई यांनी दाखवून दिले आहे. सरन्यायाधीश भूषण गवई हे सुद्धा यात अग्रेसर राहतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

## विरोधी पक्षनेतेपदाच्या निवडणुकीवरुन

# विरोधक आक्रमक

### पायऱ्यांवर आंदोलन

■ गजानन तुपे
मुंबई, दि. ८ :
विधानभवनात आज सकाळी विरोधी पक्षनेते पदाबाबत महाविकास आघाडीतील आमदारांची बैठक पार पडली. त्यामध्ये भास्कर जाधव, अजय चौधरी, जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड विजय वडेट्टीवार, सतेज पाटील हे आमदार उपस्थित होते.

या बैठकीनंतर विरोधी पक्षनेते पदाचा मुद्दा सभागृहात मांडण्याचा निर्णय घेण्यात आला. विरोधी पक्षनेते पदाचा निर्णय कधी घेणार? हा प्रश्न विधानसभा अध्यक्षांना सभागृहात विचारण्यात आला.

त्यावर, आपल्या दालनात यावर चर्चा झाल्याचे विधानसभा अध्यक्षांनी सांगितलं. तसेच, ठरल्याप्रमाणे विरोधी पक्षनेते पदाबाबत विधानसभा अध्यक्षांचे उत्तर महाविकास आघाडीतील आमदारांना रेकॉर्डवर मिळाले.

याच मुद्द्यावरुन विरोधी पक्षाचे आमदार आक्रमक झाले होते. तसेच, लवकरात लवकर विरोधी पक्षनेतेपदाची निवड करण्यात यावी, अशी मागणीही आमदारांनी केली.

महाविकास आघाडीचे आमदार सभागृहातून थेट बाहेर येऊन त्यांनी विधान भवनाच्या पायऱ्यावर आंदोलन सुरू केलं. सरन्यायाधीशांचा सत्कार होत असताना सभागृह विरोधी पक्षाविना असल्याचं त्यांनी सांगितलं.

विरोधी पक्षनेते पदावर आक्रमक होऊन महाविकास आघाडीतील आमदारांनी घोषणाबाजी सुरू केली. एवढेच काय तर महायुतीतील आमदार एका मागे एक विधान भवनात प्रवेश करत असताना त्यांच्या विरोधात घोषणाबाजी देखील करण्यात आली.

## मराठवाड्यात वाढल्या शेतकरी आत्महत्या



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ८ :
राज्यातील शेतकऱ्यांची अवस्था दिवसेंदिवस अधिकच दारूण होत असल्याचे वास्तव विधान परिषदेत सरकारने मांडलेल्या आकडेवारीतून दिसून येत आहे.

या वर्षी जानेवारी ते मार्च या अवघ्या ३ महिन्यांत राज्यात तब्बल ७६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी दिली.

विरोधी पक्षाच्या आमदारांनी वाढत्या शेतकरी आत्महत्यांबद्दल प्रश्न उपस्थित केल्यानंतर राज्याचे मदत आणि पुनर्वसन विभागाचे मंत्री मकरंद पाटील यांनी विधान परिषदेत त्यांच्या लेखी उत्तरात ही आकडेवारी सादर केली.

मराठवाड्यातील बीड जिल्हा सर्वाधिक आत्महत्या नोंदवलेल्या जिल्ह्यांच्या यादीत पुन्हा पहिल्या क्रमांकावर आहे. जानेवारी ते जून दरम्यान बीडमध्ये तब्बल १२६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली, तर मागील वर्षी याच कालावधीत ही संख्या १०१ होती.

मराठवाड्यातील उर्वरित जिल्ह्यांमध्ये जानेवारी ते जून दरम्यान, छत्रपती संभाजीनगर ९२, नांदेड ७४, परभणी ६४, धाराशिव ६३, लातूर ३८, जालना ३२, हिंगोली ३१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची आकडेवारी सादर करण्यात आली आहे.

## पुलवामा दहशतवादी हल्ल्यासाठी

# ॲमेझॉनवरून स्फोटके खरेदी

### फायनान्शियल ॲक्शन टास्क फोर्सचा अहवाल : आतंकवाद्यांना पे पल द्वारे पैसे

■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. ८ :
२०१९ च्या पुलवामा दहशतवादी हल्ल्यात वापरलेले स्फोटक साहित्य ई-कॉमर्स वेबसाइट अमेझॉनवरून खरेदी करण्यात आले होते. जगभरातील दहशतवादी निधीवर लक्ष ठेवणारी संस्था फायनान्शियल ॲक्शन टास्क फोर्स (एफएटीएफ) ने त्यांच्या अहवालात हे उघड केले आहे.



या अहवालात, एफएटीएफने २०२२ मध्ये उत्तर प्रदेशातील गोरखपूर येथील गोरखनाथ मंदिर हल्ल्याचाही उल्लेख केला आहे. या दोन्ही प्रकरणांची उदाहरणे देत, संघटनेने इशारा दिला आहे की, जर ई-कॉमर्स आणि डिजिटल पेमेंट सेवा चुकीच्या हातात गेल्या तर त्या दहशतवादाला प्रोत्साहन देण्याचे माध्यम बनू शकतात.

दहशतवादासाठी ऑनलाइन प्लॅटफॉर्मचा वापर कसा केला जात आहे, हे या अहवालात स्पष्ट केले आहे. अहवालात म्हटले आहे की, दहशतवादी संघटना आता पारंपारिक निधी पद्धतींसह ऑनलाइन पेमेंट, गेमिंग प्लॅटफॉर्म, सोशल मीडिया आणि ई-कॉमर्स साइट्स यासारख्या डिजिटल माध्यमांचा वापर करत आहेत.

एफएटीएफने जगभरातील सरकारे आणि डिजिटल कंपन्यांना या प्लॅटफॉर्मचा गैरवापर रोखण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याचा इशारा दिला आहे, कारण ते आता दहशतवादी संघटनांसाठी एक नवीन आणि प्रभावी माध्यम बनत आहेत.

एफएटीएफने आतापर्यंत ८० हून अधिक देशांचे मूल्यांकन केले आहे. हा अहवाल संयुक्त राष्ट्रांच्या दहशतवाद विरोधी युनिट आणि फ्रान्स यांच्या सहकार्याने तयार करण्यात आला आहे.

## मीरा-भाईंदरमध्ये मनसेचा भव्य मोर्चा

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ८ :
मीरा-भाईंदरमध्ये अमराठी व्यापाऱ्यांच्या मोर्चाला प्रत्युत्तर देण्यासाठी आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा जोरदार मोर्चा काढण्यात आला.

या मोर्चास पाठिंबा देण्यासाठी आलेल्या परिवहन मंत्र्यांना आंदोलकांच्या तीव्र विरोधाला सामोरे जावे लागले. संतप्त कार्यकर्त्यांनी त्यांच्या उपस्थितीविरोधात पन्नास खोके... जय गुजरात अशा घोषणा दिल्या. या गोंधळादरम्यान एका आंदोलकाने त्यांच्या दिशेने बाटली भिरकावल्याने पोलिसांनी हस्तक्षेप करत मंत्र्यांना सुरक्षितपणे त्या ठिकाणाहून बाहेर काढले.

आंदोलकांच्या म्हणण्यानुसार, मनसेचा मोर्चा सुरुवातीला शांततेत सुरू होता. मात्र, आमदार प्रताप सरनाईक घटनास्थळी पोहोचल्यानंतर वातावरण चिघळले. त्यांच्याविरुद्ध सरनाईक गो बॅक अशा घोषणा देण्यात आल्या. परिस्थिती तणावपूर्ण होताच सरनाईकांनी त्वरित आंदोलनातून माघार घेतली.

मी केवळ मराठी माणसांना पाठिंबा देण्यासाठी आलो होतो, असे स्पष्टीकरण प्रताप सरनाईक यांनी यावेळी दिले.

प्रताप सरनाईक म्हणाले, या आंदोलनात काही समाजकंटकही घुसले आहेत. राजकारण राजकारणाच्या ठिकाणी आहे. माझी भूमिका ही मोचार्ला पाठिंबा देण्याची होती, आमच्या मराठी एकीकरण समितीच्या कार्यकर्त्यांना अटक केली, त्याचा निषेध करण्यासाठी आल्याचे सरनाईक म्हणाले.

## एएआयबीने सादर केला सरकारला अहवाल

### अहमदाबाद प्लेन क्रॅश

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ८ :
अहमदाबाद विमान अपघात चौकशी ब्युरोने मंगळवारी, अहमदाबाद विमान अपघाताच्या २६ दिवसांनंतर, केंद्र सरकारला प्राथमिक चौकशी अहवाल सादर केला. प्राथमिक तपासात आणि तांत्रिक विश्लेषणात सापडलेल्या पुराव्यांच्या आधारे प्राथमिक अहवाल तयार करण्यात आला आहे. अंतिम अहवालास ३ महिने लागू शकतात.

## २५ कोटी कामगार आज संपावर जाणार

### कामगार संघटनांचा दावा बँका, पोस्ट ऑफिस बंद

■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. ८ :
बुधवार ९ जुलै रोजी अनेक राज्यांमध्ये बँका, विमा, पोस्ट, कोळसा खाणकाम, महामार्ग, बांधकाम आणि सरकारी वाहतूक यासारख्या महत्त्वाच्या सेवांवर परिणाम होऊ शकतो.

१० केंद्रीय कामगार संघटना आणि त्यांच्या संलग्न संघटनांचा दावा आहे की २५ कोटींहून अधिक कर्मचारी उद्या देशव्यापी संपावर असतील. हा संप संस्थांच्या खासगीकरणाविरुद्ध आणि चार नवीन कामगार संहितांच्या विरोधात आहे. त्याचा उद्देश केंद्र सरकारच्या धोरणांचा निषेध करणे आहे, ज्यांना संघटना कामगारविरोधी, शेतकरी विरोधी आणि कॉर्पोरेट समर्थक मानतात.

## देशात १५ टक्के अधिक पाऊस

### पूल कोसळल्याने कार वाहून गेली, ४ जणांचा मृत्यू

■ वृत्तसंस्था
भोपाळ, दि. ८ :
नैऋत्य मोसमी वारे देशभरात मुसळधार पाऊस पाडत आहेत. आतापर्यंत मान्सून हंगामात सामान्यपेक्षा १५% जास्त पाऊस पडला आहे. या वेळेपर्यंत २२१.६ मिमी पाऊस पडणे अपेक्षित होते, परंतु २५४ मिमी आधीच पडला आहे.



मध्य प्रदेशात सततच्या पावसामुळे बालाघाट, मांडला, सिवनी, इटारसी आणि कटनीसह अनेक जिल्ह्यांमध्ये पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. अनुपपूरमध्ये पूल कोसळल्याने एक कार वाहून गेली. यामध्ये पती-पत्नी आणि २ मुलांचा मृत्यू झाला.

हिमाचल प्रदेशात गेल्या ६ दिवसांत मुसळधार पावसामुळे १४ जणांचा मृत्यू झाला आहे, तर २८ जण बेपत्ता आहेत. तथापि, आता हवामान सामान्य झाले आहे. त्याच वेळी, उत्तराखंडमधील पिपलकोटी येथील बद्रीनाथ महामार्गावर भूस्खलन झाल्यामुळे रस्ता बंद झाला आहे. डेहराडूनमधील घरांमध्ये पाणी शिरले आहे.

छत्तीसगडमध्ये गेल्या ३ दिवसांपासून मुसळधार पाऊस पडत आहे. बिलासपूरमधील अनेक भाग पाण्याखाली गेले आहेत. दरम्यान, राजस्थानातील २० हून अधिक जिल्ह्यांमध्ये पाऊस सुरूच आहे. दौसा येथे भिंत कोसळल्याने एका महिलेचा मृत्यू झाला.

# आपत्ती'च्या अनुदानात घोटाळ्याचा 'पूर'

### जालना जिल्ह्यात ३५ कोटींचा अपहार २१ तलाठी निलंबित, तहसीलदार, नायब तहसीलदारासह ३६ अधिकारी संशयाच्या भोवऱ्यात

■ दीपक कैतके, मुंबई, दि. ८ :
जालना जिल्ह्यात अतिवृष्टी, गारपीट आणि अन्य नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. राज्य सरकारने नुकसान भरपाईपोटी वितरित केलेल्या अनुदानात तब्बल ३४.९७ कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याची बाब उघडकीस आली.

तहसीलदारांच्या लॉगिन व पासवर्डचा गैरवापर करून २०२२ ते २०२४ दरम्यान हा अपहार केल्याचे स्पष्ट झाले. याप्रकरणी २१ तलाठ्यांना निलंबित केले असून तहसीलदार, नायब तहसीलदार, लिपिक, ग्रामसेवक, कृषी सहायकांसह ५७ कर्मचाऱ्यांवर विभागीय चौकशी सुरू आहे, अशी माहिती राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव यांनी विधानपरिषदेत दिली. केवळ अंबड आणि घनसावंगी नव्हे तर छ. संभाजीनगर जिल्ह्यात चौकशीचे आदेश दिल्याचे ते म्हणाले.

जालना जिल्ह्यात नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या पिकांच्या अनुदानात आर्थिक व्यवहार झाल्याप्रकरणी राजेश राठोड यांनी तारांकित प्रश्न विचारला होता. मंत्री जाधव त्यावर उत्तर देताना जालनामधील आर्थिक गैरव्यवहाराची पोलखोल केली.

ते म्हणाले की, जालना जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टी गारपीट नुकसानीसाठी ५२२. २९ कोटी मंजूर केले असून अंबड तालुक्यासाठी ११२.६३ कोटी तर घनसावंगी तालुक्यासाठी ११.७७ कोटी असे एकूण १२४.४० कोटी मंजूर करण्यात आले. मात्र अनुदानात गैरप्रकार झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर जिल्हास्तरीय चौकशी समिती नेमली. या समितीने दिलेल्या अहवालात अंबड तालुक्यात १३८ पैकी १२१ गावांमध्ये आणि घनसावंगी तालुक्यात ११५ पैकी ५९ गावांमध्ये अनुदान वितरणात गैरप्रकार झाल्याची बाब समोर आली. शेती नसलेल्या ६२६९ खातेदारांना २३.६९ कोटी, दुबार नावाने ७ हजार खातेदार, क्षेत्रवाढ दाखवून ६९१ खातेदारांना १.१७ कोटी, तसेच शासकीय जमिनीवर अनधिकृतरीत्या दाखवलेले १७ खातेदारांना २.९९ लाखांचे अनुदान वाटप झाले.

## भोसले राजघराण्याची ऐतिहासिक तलवार लवकरच महाराष्ट्रात : ॲड. आशिष शेलार



**मुंबई :** मराठ्यांच्या पराक्रमाची साक्ष असलेली नागपूरच्या भोसले घराण्याशी संबंधित असली ऐतिहासिक तलवार महाराष्ट्रात परत आणली जात असून ही संपूर्ण राज्यासाठी अभिमानास्पद बाब असल्याचे सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी विधानसभेत महाराष्ट्र विधानसभा नियम 293 व विधानपरिषदेत नियम 260 अन्वये मांडलेल्या सत्ताधारी पक्षाच्या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना सांगितले. मंत्री ॲड.. शेलार यांनी सांगितले, इतिहासातील अत्यंत मोलाच्या वस्तूची पुनर्प्राप्ती करून मराठ्यांच्या पराक्रमाची आठवण जागवली जात आहे. लंडनमध्ये लिलावात नागपूरच्या भोसले राज घराण्याशी संबंधित ऐतिहासिक तलवार महाराष्ट्रात परत आणण्याचा उपक्रम यशस्वी ठरला आहे. ही तलवार छत्रपती शाहू महाराजांच्या काळात रघुजी भोसले (प्रथम) यांनी बंगाल व ओडिशापर्यंत लढलेल्या लष्करी मोहिमांमध्ये वापरलेली होती. सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. शेलार यांनी सांगितले, लंडनमधील एका कंपनीच्या लिलावात ही तलवार विक्रीसाठी ठेवण्यात आली होती.

# सार्वजनिक विद्यापीठे, अशासकीय महाविद्यालयांमधील रिक्त पदांच्या भरतीस वेग येणार

# अभियांत्रिकी संस्थांमध्ये १०० टक्के पदभरतीस मान्यता : मुख्यमंत्री

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :**

राज्यातील अकृषी सार्वजनिक विद्यापीठ आणि अशासकीय महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर रिक्त पदे भरल्यास नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीनुसार उच्च शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यास मदत होणार आहे. राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांमधील आणि अशासकीय महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर पदभरती रिक्त पदांच्या भरतीस सकारात्मक प्रतिसाद मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून देण्यात आला. तसेच अभियांत्रिकी शासन अनुदानित संस्थांमध्ये १०० टक्के पदभरतीसही अनुकूलता दाखवण्यात आली. अकृषी विद्यापीठातील शिक्षक आणि शिक्षकेतर पदांचा आकृतिबंध लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावा, अशा सूचनाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.




विधानभवन येथे उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या विविध विषयांवर आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी विद्यापीठांच्या प्रलंबित मागण्यांबाबत चर्चा करण्यात आली. बैठकीत उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, अपर मुख्य सचिव वेणूगोपाल रेड्डी, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, अपर मुख्य सचिव सौरभ, नियोजनचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अतुल वैद्य, उच्च शिक्षण संचालक शैलेंद्र देवळाणकर, तंत्र शिक्षण संचालक विनोद मोहितकर, ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर आदींसह अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यात तंत्रज्ञान विद्यापीठांची संख्या कमी असून, ही विद्यापीठे पूर्ण क्षमतेने सुरू ठेवणे गरजेचे आहे. यामुळे विद्यार्थ्यांना अधिक संधी प्राप्त होतील व गुणवत्ता वाढेल. लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठात १०५ अध्यापकीय पदे, एक शिक्षक समकक्ष पदांस मंजुरी देण्यात यावी असे निर्देश मुख्यमंत्री यांनी दिले. याचबरोबर इतर विद्यापीठाप्रमाणे तंत्रज्ञान विद्यापीठात आठ कोटी रुपए दैनंदिन व प्रशासकीय खर्च भागविण्यासाठी प्रदान करण्यास यावेळी मान्यता देण्यात आली. तसेच ७८८ अध्यापकीय पदे, २,२४२ इतकी शिक्षकेतर पदे भरण्यात मान्यता देण्यात आली आहे.

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील रिक्त सहाय्यक प्राध्यापक संवर्गातील ५,०१२ पदांच्या भरतीस मान्यता देण्यात आली आहे. तसेच व्ही.जे.टी.आय व गुरूगोविंदसिंग अभियांत्रिकी महाविद्यालय नांदेड यांसह राज्यातील इतर शासन अनुदानित संस्थांमध्ये १०० टक्के पदभरतीस मान्यता देण्यात आली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठास एकूण ६०३ पदांचा सुधारित आकृतीबंधही मंजूर करण्यात आला.

ग्रंथालय अनुदानात ४० टक्के वाढ करण्याच्या प्रस्तावाला मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिली असून, हा प्रस्ताव तातडीने वित्त विभागाकडे पाठवावा, अशा सूचना त्यांनी दिल्या.

तसेच अ, ब, क ड श्रेणीतील ग्रंथालयांची तपासणी करून त्यांच्या श्रेणीवाढीस तत्त्वतः मान्यता देण्यात आली असून, त्यासाठी लागणाऱ्या वाढीव अनुदानाचा प्रस्ताव वित्त विभागाकडे सादर करावा. याचबरोबर राज्यातील 1,706 ग्रंथालयांची मान्यता रद्द केलेल्या प्रमाणात नवीन ग्रंथालयांना शासन मान्यता देण्याबाबत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

## कांदळवनच्या बफरझोन भरावाबाबत संयुक्त बैठक घेणार : पंकजा मुंडे



**मुंबई :** बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील पहाडी गोरेगाव येथील कांदळवन क्षेत्रापासून ५० मीटरच्या आत बफरझोनमधील अवैध भराव करून होत असलेल्या कामाची पाहणी आमदार व अधिकाऱ्यांसह प्रत्यक्ष भेट देऊन करण्यात येईल. प्रत्यक्ष पाहणीनंतर सर्व संबंधित विभागांसमवेत संयुक्त बैठक घेऊन आवश्यकता असल्यास चौकशी समिती नेमण्यात येईल, अशी माहिती पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी विधानपरिषदेत दिली. सदस्य ॲड. अनिल परब यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधीला उत्तर देताना मंत्री मुंडे बोलत होत्या. यावेळी सदस्य सर्वश्री भाई जगताप, प्रवीण दरेकर, सचिन अहिर यांनी चर्चेत सहभाग घेतला होता. पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, मौजे पहाडी गोरेगाव, (ता. बोरीवली) येथील खासगी जागेवर सुमारे ३०० एकर पेक्षा अधिक क्षेत्र हे समुद्रकिनारी आणि कांदळवन क्षेत्रात आहे. मंजूर सागरी किनारा व्यवस्थापन आराखडानुसार सी आर झेडच्या क्षेत्राच्या बाहेरील भूखंड ना विकास क्षेत्र मधुन वगळून "निवासी"क्षेत्र करण्यात आला आहे. ही जमीन राष्ट्रीय विधी विद्यापीठ करिता राखीव ठेवण्यात आली आहे.

## दारूबंदीचे निवेदन प्राप्त झाल्यास कार्यवाही

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांची ग्वाही

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :**

खारघर परिसरात प्रभागाकरिता दारूबंदी करण्याबाबत विहित प्रक्रियेनुसार निवेदन प्राप्त झाल्यास योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

खारघर परिसरातील दारू विक्री परवाना रद्द करून दारूमुक्त क्षेत्र म्हणून घोषित करण्याबाबत विधानसभा सदस्य प्रशांत ठाकूर यांनी मांडलेल्या लक्षवेधी सूचनेवर उत्तर देताना उपमुख्यमंत्री अजित पवार विधानसभेत बोलत होते.

सन २००८ व २००९ च्या अधिसूचनेनुसार नगरपरिषद / महानगरपालिका क्षेत्रातील एखाद्या प्रभागातील २५ टक्के पेक्षा कमी नसलेल्या महिला मतदार किंवा एकूण मतदारांनी लेखी निवेदन दिल्यास संबंधित जिल्हाधिकारी यथास्थिती गुप्त पद्धतीने मतदान घेण्याची प्रक्रिया पूर्ण करतील. जर संबंधित प्रभागातील एकूण मतदार किंवा



महिला मतदारांच्या संख्येच्या किमान 50 टक्केपेक्षा अधिक अनुक्रमे एकूण मतदार किंवा महिला मतदार यांनी मद्य विक्रीची अनुज्ञप्ती बंद करण्याच्या बाजूने मतदान केल्यास त्या क्षेत्रात मद्यविक्री अनुज्ञप्ती बंद करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात येतात, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केले.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, ग्रामपंचायतीचे नगरपालिकेत किंवा महानगरपालिकेत रूपांतर झाल्यानंतर अनुज्ञप्ती संदर्भात कोणती कार्यवाही करावी यासंदर्भात शासनाने वेळोवेळी नियमांमध्ये बदल केले आहेत. 1972 पासून राज्यात नवीन अनुज्ञप्तीची परवानगी देण्यात येत नाही. तथापि, विहित कार्यपद्धतीनुसार एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित करण्यास परवानगी देण्यात येते. मद्य विक्रीची अनुज्ञप्ती बंद करण्यासंदर्भात नगरपालिका किंवा महानगरपालिकेतील उपस्थित नागरिकांच्या नव्हे तर एकूण मतदारांच्या 50 टक्के पेक्षा अधिक अनुक्रमे एकूण मतदार किंवा महिला मतदारांचा निर्णय विचारात घेतला जाईल, असेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभा सदस्य अभिमन्यू पवार यांनी उपस्थित केलेल्या मुद्यास उत्तर देताना स्पष्ट केले.

## भरधाव वाहनांच्या वेगवेगळ्या अपघातांत दोघांचा मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ८ :**

पुणे शहरात जड वाहने भरधाव चालवून अपघात घडण्याच्या घटना सातत्याने घडू लागल्या असून त्यात जीवितहानी होत आहे. अशाचप्रकारे खडकी आणि वाघोली परिसरात भरधाव वाहनांनी धडक दिल्याने दोन जणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी खडकी पोलीस ठाणे आणि वाघोली पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

वाघोली परिसरात केसनंद याठिकाणी पाटील वस्ती जवळ अक्षय विजू आहेर (वय 25 )या तरुणाची आई विमल विजू आहेर ( वय 54) यांना कोणत्यातरी अज्ञात वाहनावरील चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने हायगयीने निष्काळजीपणे धोकादायकरीत्या चालवत त्यांच्या आईला जोराची धडक दिली.

या अपघातामध्ये विमाला आहेर यांना किरकोळ व गंभीर स्वरूपाची दुखापत करून त्यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरला. आरोपी अपघातानंतर त्याचे वाहन घेऊन पळून गेला आहे .याबाबत वाघोली पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुसऱ्या घटनेत खडकी परिसरात पोस्ट ऑफिस समोरील रस्त्यावर दक्षिण वाहिनीच्या चौका जवळ अज्ञात ट्रक चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन हे भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवले ,त्यामुळे एक 55 वर्षीय अनोळखी व्यक्ती यास पायी चालत असताना त्याला जोराची धडक संबंधित ट्रकने देऊन त्याच्या मृत्यूस अज्ञात वाहन चालक जबाबदार ठरल्याचा प्रकार घडला आहे. सदर अपघातानंतर ट्रक चालक हा त्याच्या वाहनासह पसार झाला असून याबाबत खडकी पोलीस ठाण्यात संबंधित चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## जलसंपदा यांत्रिक विभागाच्या देयकासंदर्भात चौकशी करणार : राधाकृष्ण विखे पाटील



**मुंबई:** जलसंपदा विभागाच्या नाशिक येथील यांत्रिकी विभागात तत्कालीन कार्यकारी अभियंता ८ ऑगस्ट २०१९ ते १८ जून २०२५ या कालावधीत कार्यरत होते. या कार्यकाळातील कंत्राटदारांना अदा केलेल्या देयकांची चौकशी करून यासंदर्भात उचित कार्यवाही केली जाईल, असे जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात सांगितले. सदस्य हिरामण खोसकर यांनी या संदभार्तील लक्षवेधी सूचना विधानसभेत मांडली. या लक्षवेधीच्या चर्चेत सदस्य विजयसिंह पंडित यांनी सहभाग घेतला. जलसंपदा मंत्री विखे-पाटील यांनी सांगितले, तत्कालीन कार्यकारी अभियंता यांची ३० मे २०२५ च्या शासन आदेशान्वये बदली झाली.

## हिंजवडी आयटी पार्कसाठी नोडल अधिकाऱ्याची गरज : सुप्रिया सुळे

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ८ :**

बारामती लोकसभा मतदार संघातील मुळशी तालुक्यातील हिंजवडी येथील राजीव गांधी आयटी पार्क हे जागतिक दर्जाचे केंद्र असून त्यादृष्टीने येथे उत्तम सुविधा उपलब्ध होणे आवश्यक आहे. हिंजवडी, राजीव गांधी आयटी पार्क, माण, मारुंजी आदी परिसरामध्ये नागरिकांना ट्रॅफिक, रस्ते, वीज, पाणी तुंबणे या सारख्या समस्यांना समोरे जावे लागत आहे.



या भागातील पायाभूत सुविधांच्या बाबतीत येणाऱ्या अडचणींवर लवकर मार्ग निघत नाही. यासाठी नागरीकांना एमआयडीसी, महापालिका, मेट्रो, पीएमआरडीए, महावितरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलीस खाते आदी आस्थापनांकडे मोठा पाठपुरावा करावा लागतो. या शासकीय आस्थापनांमध्ये समन्वयाचा अभाव असल्याने यामध्ये नागरीकांचा वेळ जातो.

शिवाय मनस्ताप देखील सहन करावा लागतो. त्यामुळे हिंजवडी येथील राजीव गांधी आयटी पार्क मधील अडचणी सोडवण्यासाठी सक्षम नोडल अधिकारी नेमण्याची मागणी खासदार सुप्रिया सुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. सुळे म्हणाल्या, महाराष्ट्र सरकारने तातडीने हिंजवडी-माण-मारुंजी क्लस्टर आणि जांभे, गहुंजे, नांदे, लवळे, पिरंगुट, भुकुम आणि इतर शेजारील जलद शहरीकरण होत असलेल्या भागांसाठी एक स्वतंत्र प्रशासकीय संस्था स्थापावी. या स्वतंत्र संस्थेची विशेष शहर विकास प्राधिकरण किंवा औद्योगिक नगर प्रशासन प्राधिकरण या स्वरूपात रचना करता येईल, ज्यामुळे एकात्मिक नियोजन, निधी व्यवस्था आणि सेवा पुरवठा यासाठी स्वायत्तता सुनिश्चित होईल. यामुळे नागरिकांना आपल्या अडीअडचणींबाबत पाठपुरावा करणे सोपे होईल, अशी मागणी करण्यात आली आहे.

## 'गोदावरी'च्या पाणीपातळीत वाढ

### नदीकिनारी सतर्कतेचा इशारा



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :**

राज्यात मुसळधार पावसाचा जोर कायम आहे. नाशिकसह पूर्ण महाराष्ट्रातील धरणातील पाणी साठा वाढला आहे. नाशिक जिल्ह्यातील 23 धरणांपैकी 7 धरण हे पूर्ण क्षमतेने भरले आहे. बहुतेक धरणांमधून विसर्ग सुरू असून पाणी साठ्याची पातळी 63% पर्यंत पोहोचली आहे. यामध्ये गंगापूर, दारणा, नांदूर मधमेश्वर या प्रमुख जलसाठ्यांचा समावेश आहे. ज्यांचा विसर्ग वेगाने सुरू आहे. गंगापूर धरणातून 6,336 क्युसेक्सपासून एकाच कालावधीत 2,132 ते 3,716 क्युसेक्सपर्यंतचा विसर्ग नोंदला गेला आहे.

हवामान विभागाच्या ताज्या अंदाजानुसार, नाशिक, छत्रपती संभाजीनगर परिसरात आजही ढगाळ वातावरण आहे. या भागात हलक्या ते मध्यम स्वरुपात पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. 9 जुलै साठी देखील ढगाळ वातावरणासह पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. गोदावरी नदीची पाणी पातळी लक्षणीय वाढल्यामुळे नदीकिनारी वस्ती व रस्त्यांना धोका राहण्याची शक्यता आहे.

गंगापूर धरणातून पाण्याचा विसर्ग वाढल्याने, गोदावरी नदीचा प्रवाह वाढला आहे. नांदूर मधमेश्वर येथील नदीच्या पाणी पातळीत देखील वाढ झाली आहे. नाशिकच्या रामकुंड परिसरात अहिल्याबाई होळकर पुलाखाली प्रवाह इतका वाढला की अनेक छोटी-मोठी मंदिरे पाण्याखाली गेली आहेत.

मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर आणि इतर जिल्ह्यांसाठी येत्या दोन दिवसांत मान्सून सक्रिय राहणार आहे. वातावरण ढगाळ राहील आणि दोन्ही दिवसांत दुपारी हलक्या ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता मान्सूनमुळे मुंबईत सलग ढगाळ वातावरण राहील.

## मराठी माणसांचा अपमान करणाऱ्या नेत्यांनी बाळासाहेबांचा फोटो वापरू नये : संजय राऊत



**मुंबई :** एकनाथ शिंदे यांच्या पक्षाच्या लोकांनी बाळासाहेब ठाकरेंचा घरात लावलेला फोटो काढून टाकावा. कारण त्यांच्या पक्षाचा अमित शहांच्या पक्षाचा एक निशिकांत दुबे नावाचा माणूस मराठी माणूस आणि महाराष्ट्राविषयी काय बोलत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लाज नाही का वाटत असा सवाल ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी केला आहे. सत्ताधारी खूर्ची उबवायला बसले आहेत का? असेही त्यांनी म्हटले आहे. 50 पोलिस घेऊन फिरतो एका पटवणीचा नाही. हा छत्रपती शिवाजी महाराज आणि बाळासाहेब ठाकरे यांचा महाराष्ट्र आहे. दुबे हा दलाल माणूस आहे, याची अनेक ठिकाणी दलाली चालते. सुप्रिया सुळेंना विचारु शकतात. त्यांची डिग्री बोगस असून ते उद्योजकांकडून खंडणी वसूल करतात.

## विवाहितेची गळा चिरून हत्या

■ **महासागर प्रतिनिधी, सातारा, दि. ८ :**

साताऱ्यातील शिवथर गावात भर दुपारी घरात एकटी असलेल्या 25 वर्षीय विवाहितेची गळा चिरून निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. पूजा प्रथमेश जाधव असे मयत विवाहितेचे नाव असून, या प्रकरणात पोलिसांनी गावातीलच 28 वर्षीय संशयित युवकाला ताब्यात घेतले आहे. प्राथमिक तपासात ही हत्या एकतर्फी प्रेमातून झाल्याचे समोर आले आहे.

सोमवारी दुपारी पूजा जाधव घरी एकटी होती. तिचे पती प्रथमेश जाधव मुलाला शाळेत सोडून कामावर गेले होते, तर सासू-सासरे शेतात गेले होते. घराचे सर्व दरवाजे उघडे असल्याने शेजारी राहणाऱ्या एका आजीनं घरात डोकावलं असता रक्ताच्या थारोळ्यात विवाहितेचा मृतदेह दिसून आला. त्यांनी तत्काळ आरडाओरडा करत शेजाऱ्यांना बोलावलं.

घटनेची माहिती मिळताच साताऱ्याचे डीवायएसपी राजीव नवले, सहाय्यक पोलिस निरीक्षक मोर्डे, महसूल अधिकारी विशाल पवार आणि श्वान पथक तातडीने घटनास्थळी पोहोचले. पंचनामा करून मृतदेह क्रांतिसिंह नाना पाटील जिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला.

या प्रकरणी पोलिसांनी शिवथर येथीलच 28 वर्षीय तरुणाला ताब्यात घेतले असून, प्राथमिक तपासात या तरुणाचे विवाहितेशी एकतर्फी प्रेमसंबंध होते. तिच्याकडून प्रेमास नकार मिळाल्याने संशयिताने संतापातून घरात घुसून तिच्या गळ्यावर धारदार शस्त्राने वार करून हत्या केल्याचा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे.

## एकनाथ शिंदेंच्या पक्षाला लागणार गळती

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ८ :**

मराठीच्या मुद्यावर राज व उद्धव ठाकरे यांनी एकत्र येण्याची घोषणा केली. त्याचा मोठा फटका उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेनेला बसण्याची शक्यता आहे. याची प्रचिती आता येऊ लागली आहे. सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या एका नेत्याने सत्ताधारी शिवसेनेचा कोकणातील एक बडा नेता लवकरच ठाकरे गटात परतणार असल्याचा दावा करून एकच खळबळ उडवून दिली आहे. ठाकरे बंधूंनी मराठीच्या अस्मितेसाठी एकत्र येण्याचा निर्णय घेतला आहे.

# आरोग्य विद्यापीठाच्या पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण संस्थेतील रुग्णांकरिता मिळाले

■ **महासागर प्रतिनिधी नाशिक, दि. ८ :**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व आरोग्य विद्यापीठाच्या पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण संशोधन संस्था, नाशिक येथे भुलशास्त्र विभागात सी.एस.आर. निधी देण्याचा कार्यक्रम नुकताच संपन्न झाला. एम.एस.एल. ड्राईव्ह लाईन सिस्टीम प्रायव्हेट लिमिटेड व रोटरी क्लब, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने भुलशास्त्र विभागाला दहा लाख रुपयांचा निधी देण्यात आला. या निधीतून वैद्यकीय महाविद्यालयात येणाऱ्या गोरगरीब रुग्णांना अद्यावत भुल देण्यासाठी लागणारे उपकरण ( फ्लेक्झिबल ब्रॉन्कोस्कोप) घेण्यात आले.



यावेळी महाराष्ट्र पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण संशोधन संस्थेच्या अधिष्ठाता डॉ. मृणाल पाटील, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. व्यंकट गिते, एम.एस.एल. ड्राईव्ह लाईन सिस्टीम प्लॅनटचे प्रमुख श्री. भुषण पटवर्धन व रोटरी क्लबचे अध्यक्ष गौरव सामणेरकर, वरिष्ठ रोटरीयन रवी महादेवकर आणि विजय दिनानी, सौ. शिल्पा पारख, ओमप्रकाश रावत तसेच रोटरी क्लबचे इतर सदस्य व भुलशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. सुनिता संकलेचा व इतर शिक्षकवृंद उपस्थित होते.

याबाबत माहिती देतांना अधिष्ठाता डॉ. मृणाल पाटील सांगितले की, हा सी.एस.आर. निधी वरिष्ठ रोटरीयन रवी महादेवकर व भुषण पटवर्धन यांच्या अथक प्रयत्नांमुळे भुलशास्त्र विभागाला मिळाला. मागील वर्षी मिळालेल्या सी.एस.आर. निधीतून घेतलेल्या उपकरणांचा योग्य वापर गरजु रुग्णांच्या सुरक्षिततेसाठी करण्यात आला. त्याबददल सर्व टीमने भुलशास्त्र विभागाच्या कामाचे कौतुक केले.

यावेळी भुलशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. सुनिता संकलेचा यांनी माहिती दिली की, फ्लेक्झिबल ब्रॉन्कोस्कोप चा वापर ऑपरेशन थेटरमध्ये भुल देतांना करण्यात येतो. ज्या रुग्णांमध्ये तोंड पुर्ण उघडने शक्य नसते किवा अपघाता मध्ये तोंडाचे फॅक्ररर्स झालेले असतात अशा रुग्णांना सुरक्षित भुल देण्यासाठी हया उपकरणाचा उपयोग होतो.

# राज्यात ६२ हजार नवउद्योजकांची निर्मिती : उदय सामंत

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ८ :**

दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत झालेल्या करारांची अंमलबजावणी करण्यामध्ये देशात महाराष्ट्र पहिले राज्य आहे. राज्याची टक्केवारी ८५ ते ८७ असून गेली तीन वर्ष सातत्याने राज्यात परकीय गुंतवणुक येण्याचा ओघ वाढत आहे. गडचिरोली जिल्ह्यात १ लाख कोटी गुंतवणूक असलेल्या स्टील उद्योग आल्यामुळे औद्योगिक जिल्हा म्हणून या जिल्ह्याची ओळख निर्माण होत आहे. या उद्योगस्नेही वातावरणामुळे राज्यात मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत मागील तीन वर्षात ६२ हजार नव उद्योजक निर्माण झाले आहेत, अशी माहिती उद्योग, मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी नियम २९३ अन्वये सत्ताधारी पक्षाच्यावतीने मांडलेल्या ठरावावर उत्तर देताना दिली.

सामंत म्हणाले, गडचिरोली जिल्ह्यात निर्माण होत असलेल्या स्टील हबमुळे चंद्रपूर, गोंदिया, भंडारा आदी जिल्ह्यात स्टील उद्योगाची परिसंस्था निर्माण होणार आहे. छत्रपती संभाजीनगर येथे ६० हजार कोटी, रत्नागिरी जिल्ह्यात ३० हजार कोटींची गुंतवणूक आणली आहे. राज्यात सर्व विभागात समतोल औद्योगिक विकास करण्याची शासनाची भूमिका आहे. उद्योजकांना गुंतवणुकीसाठी प्रोत्साहन देण्यासाठी जिल्ह्यात जिल्हा उद्योग परिषद उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या माध्यमातून यावर्षी १ लाख ४५ हजार कोटींची गुंतवणूक झाली आहे. विश्वकर्मा योजना अंमलबजावणी करण्यामध्ये राज्य देशात पहिल्या तीन राज्यांमध्ये आहे. मधाचे गाव योजनेची अंमलबजावणी करण्यात आली आहे.



राज्यात मागणीनुसार आवश्यकतेप्रमाणे औद्योगिक वसाहती स्थापन करण्यासाठी हजारो एकर जमिनीचे संपादन करण्यात येत आहे.

त्यामुळे राज्यात नवीन औद्योगिक वसाहती सुरू करण्यात येतील. छत्रपती संभाजीनगर येथील ऑरिक सिटी, म्हसवड कॉरिडॉर, दिघी पोर्ट कॉरिडर राज्याच्या उद्योग समृद्धीत भर घालणार आहे. उद्योजकांना ताकद व उद्योगांच्या विकासासाठी राज्य शासन तत्पर आहे, अशी ग्वाही उद्योग मंत्री श्री. सामंत यांनी दिली.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे ९५ टक्के काम पूर्ण झाले आहे. या विमानतळाच्या विकासाचा पहिला टप्पा सप्टेंबर २०२५ पर्यंत पूर्ण होणार आहे. या विमानतळाचे सप्टेंबरपर्यंत उद्घाटन करण्याचे नियोजन आहे, अशी माहिती मंत्री उदय सामंत यांनी नियम २९३ अन्वये उपस्थित केलेल्या सत्ताधारी पक्षाच्या ठरावावरील उत्तर देताना दिली.

मंत्री उदय सामंत म्हणाले, मुंबई शहरातील रस्ते खड्डे मुक्त करण्यासाठी सिमेंट काँक्रिटीकरण रस्ते योजना दोन टप्प्यात राबविण्यात येत आहे. या अंतर्गत बरीच रस्त्यांची कामे पूर्ण झाली आहेत. पुढील दोन वर्षांनी मुंबईकरांना खड्डे मुक्त प्रवासाचा अनुभव येईल. या कामामुळे पर्यावरणावर परिणाम होणार नसून याबाबत महापालिकेने काळजी घेतली आहे. ' बेस्ट' या उपक्रमाला यावर्षी १ हजार कोटी रुपयांची मदत करण्यात आली असून आवश्यकतेनुसार आर्थिक मदत महापालिकेच्यावतीने देण्यात येते. महापालिकेने आतापर्यंत बेस्ट उपक्रमाला ११ हजार ४०५ कोटी रुपयांचा निधी दिला आहे. अंधेरी पूर्व भागामध्ये आवश्यकता आणि गरजेनुसार नवीन रुग्णालयाची निर्मिती महापालिकेच्या माध्यमातून करण्यात येईल.

मुंबई शहराच्या २०३४ च्या विकास नियोजनात (डिपी) मध्ये कोळीवाड्यांचे सीमांकन करण्यात येईल. तसेच म्हाडा यंत्रणेच्या मुंबई शहरातील पुनर्विकासाची पद्धत उपनगरातील आणण्याबाबत शासन सकारात्मक आहे. मुंबई महानगर प्रदेश विकासासाठी आठ विविध एजन्सी कार्यरत आहेत.

## घुग्घूस शहरात साफसफाईची आवश्यकता

**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घूस, दि. ८ जुलै :** सात जून २०२५ पासून पावसाळा सुरू झाला आहे त्यामुळे परिसरात नाल्या डबके खड्डे हे पाण्याने तुडूंब भरले आहे. सध्या परिसरात ठिक ठिकाणी कचरा व घाण जमा झाली आहे. त्यामुळे ठिक ठिकाणी दुर्गंधी पसरत आहे नागरिक सुद्धा त्रस्त झाले आहे या कचऱ्यामुळे व पाण्यामुळे येथील नागरिकाला डेंगूचे व कीटकाचे प्रमाण वाढत आहे त्याकरिता २ जुलै रोजी संत श्री साईबाबा बहुउद्देशीय मंडळाच्या वतीने व नागरिकांच्या वतीने घुग्घूस नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

## भद्रावतीत बुलेट चालकांची दबंगगीरी

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**भद्रावती, दि. ८ जुलै :** शहरात रायल एन्फ़िल्ड या कंपनीची बुलेट हि दुचाकी शहरात रस्त्यावर ५० ते ६० या वेगाने धावत धूम करत आहे. रस्त्यावरचे गतिरोधक असो वा एखादी मध्यंतरी रस्ता ओलांडतांना, किंवा एखादी रस्त्यावरचे बसलेले जनावर. मात्र बुलेटचा वेग हा कायमच जोरात दिसतो. वाहतूक विभागाने दिलेल्या वेगाला आवरा आणि जीवाला सावरा या सूचनेचे पालन भद्रावती शहरत होताना दिसतच नाही. अपघाताला निमंत्रण देणारी हि अल्पवयीन बुलेट चालक आपला जीव धोक्यात आणत आहे.

# अमृत २.० अंतर्गत खोदण्यात आलेल्या रस्त्यांच्या पुर्नबांधणी कामास प्रारंभ

**महासागर प्रतिनिधी**



**चंद्रपूर, दि. ८ जुलै :** शहरातील पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० (Atal Mission for Rejuvenation and Urban Transformation) योजनेअंतर्गत महत्त्वाचे प्रकल्प मनपातर्फे हाती घेण्यात आले आहेत.

या योजनेअंतर्गत वाढीव पाणीपुरवठा यंत्रणा तसेच मलनिःस्सारण योजनेच्या कामासाठी शहरातील विविध भागांमध्ये अनेक रस्त्यांवर खोदकाम करावे लागले होते. या रस्त्यांचे पुनर्बांधकाम, मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम टप्प्याटप्प्याने करण्यात येत आहे. पाणीपुरवठा योजनेअंतर्गत शहरात आजपावेतो ४७ किलोमीटर पाईपलाईन टाकण्यात आली असुन विठ्ठल मंदिर,ठक्कर कॉलोनी,पठाणपुरा,एकोरी वॉर्ड येथील रस्त्यांचे काम पुर्ण करण्यात येत आहे.इरई धरणावर नवीन इंटेक वेल व जॅकवेलचे काम प्रस्तावित असुन येथुन अतिरिक्त पाणी उचल करण्यात येणार आहे. तसेच तुकूम येथे ५३ दशलक्ष लिटर क्षमतेचे नवीन जलशुद्धीकरण केंद्र उभारण्यात येत असुन ६ नवीन जलकुंभ सुद्धा उभारण्यात येणार आहे. तर ३८ हजार नवीन नळ जोडणी करण्यात येणार आहे.

मलनिःस्सारण योजनेअंतर्गत ३२ किलोमीटर पाईपलाईन टाकण्यात आली असुन पागल बाबा नगर,विठ्ठल मंदिर,ठक्कर कॉलोनी,बाबुपेठ, गोपाळपुरी,नरेंद्रनगर इंडस्ट्रिअल येथील रस्ता पुनर्बांधणीचे काम सुरु आहे.शहराची वाढती लोकसंख्या बघता मलनिःस्सारणाची योग्य व्यवस्था हे दीर्घकालीन नियोजनाचे पाऊल आहे.

यामुळे मोकळया नाल्यांमध्ये सांडपाणी जाण्याऐवजी ते प्रक्रिया केंद्रात गेल्याने शहरात दुर्गंधी आणि घाणीचे प्रमाण कमी होणार आहे. पुनर्वापर केलेले सांडपाणी बागायती,सिमेंट उद्योग,औद्योगिक वापर,वाटर स्प्रे बांधकामासाठी वापरता येईल. खुल्या नाल्यांमुळे रोगकारक जंतु व जी दुर्गंधी पसरते त्यावर मलनिःस्सारण प्रकल्पामुळे आळा घालता येऊ शकतो. तसेच यामुळे सुदृढ आरोग्य पातळीत वाढ होऊन मच्छरांचा त्रासही कमी होतो. सदर कामांमुळे काही भागांतील नागरिकांना तात्पुरती गैरसोय झाली असली, तरी या दीर्घकालीन प्रकल्पांमुळे शहराला भक्कम व टिकाऊ पायाभूत सुविधा प्राप्त होणार आहेत. चंद्रपूर महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# चिमूर तालुक्यातील सरपंच पदाचे आरक्षण जाहीर

## २०२५ ते २०३०, एकुण ९२ ग्राम पंचायत

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**चिमूर, दि. ८ जुलै :** चिमूर तालुक्यातील ९२ ग्रामपंचायत चे बाबतीत सन २०२५ ते २०३० या कालावधीकरिता प्रवर्गनिहाय आरक्षण राजीव गांधी सभागृह तहसिल कार्यालय चिमूर येथे दिनांक ८ जुलै २०२५ ला दुपारी २ वाजता जाहीर करण्यात आले.

अनुसुचित जाती ग्राम पंचायत गोंदेडा, टेकेपार तु, केसलाबोडी, मदनापुर, डोमा, शिवापुर बंदर, चिंचाळा कुणबी, चक जाटेपार, अनुसुचित जाती महिला विहीरगांव तु, मुरपार तु, खानगांव बोथली, रेंगाबोडी, नविन नवेगांव, गदगांव, कवडशी डाक, लोहारा, अनुसुचित जमाती भिवकुंड, अडेगांव देश, कवडशी देश, उसेगांव, खानगांव, वडशी, खापरी धर्मु, नेरी, जवराबोडी, सोनेगांव वन, खांबाडा, खुटाळा मो, जामगांव को., सिरसपुर, कोटगांव, पुयारदंड. अनुसुचित जमाती महिला नविन जामनी, पेठ भान्सुली, मानेमोहाडी, खैरी, नवेगांव पेठ, मोटेगांव, सावरी बीड, काजळसर, सातारा, सावर्ली, तळोधी गांव, मालेवाडा, नवतळा, महादवाडी, बोथली वहा, कळमगांव, शिरपुर. ना मा प्र. हिरापुर, विहीरगांव, चकजांभुळविहीरा, पारडपार, महालगांव काळू, किटाळी तु, वाघेडा, आमडी बे, बोडधा, कोलारा तु, नवतळा, कपर्ला खुद. ना मा प्र. महिला गडपिपरी, पिपर्डा, शिवरा, आंबेनेरी, बोरगांव बुटी, येरखेडा, बोथली शिरपुर, नंदारा, सावरगांव, वाकर्ला, साठगांव, आंबोली, चिचोली. सर्वसाधारण जांभुळघाट, पांजरेपार, खडसंगी, केवाडा मोकासा, अमरपुरी, लावारी मरार, किटाळी मक्ता, शंकरपुर, हिवरा,पळसगांव, मेटेपार, शिरपुर, पिंपळगांव, कोलारी, चिंचाळा शास्त्री, मासळ बु व म्हसली. अशाप्रकारे प्रवर्ग निहाय सरपंच पदाचे आरक्षण जाहीर करण्यात आले. यावेळी चिमूर तालुका निवडणूक अधिकारी तथा तहसीलदार श्रीधर राजमाने , कर्मचारी व विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी तथा कार्यकर्ते व असंख्य नागरिक उपस्थित होते.

# धान उत्पादक शेतकऱ्यांना बोनसचा उर्वरित निधी वितरीत करा

## आमदार सुधीर मुनांटीवार यांची सरकारकडे मागणी, चंद्रपूर जिल्ह्यासाठी विशेष योजना राबवण्यासाठी वेधले लक्ष

**महासागर प्रतिनिधी**



**चंद्रपूर, दि. ८ जुलै :** धान उत्पादक शेतकऱ्यांच्या दीर्घकाळाच्या मागणीला प्रतिसाद देत राज्य सरकारने हेक्टरी २० हजार रुपयांचा बोनस जाहीर करून एक महत्त्वाचा निणऱ्य घेतला आहे. २५ मार्च रोजी शासन निर्णय जारी झाल्यानंतर शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला. मात्र,अद्याप केवळ अर्धाच निधी वितरित करण्यात आला आणि ज्या शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे त्यांना निधी उपलब्ध झालेला नाही. या मुद्द्यावर राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री, आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी सोमवारी (दि. ७ जुलै) विधानसभेत आवाज उठवत सरकारचे लक्ष वेधले. चंद्रपूर जिल्ह्याला धान उत्पादनासाठी विशेष योजना देण्याचीही जोरदार मागणी त्यांनी केली आहे. विधानसभेत पुरवणी मागण्यांवरील चर्चेत ते बोलत होते.

२५ मार्च रोजी जाहीर झालेल्या शासन निणऱ्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला होता. सुमारे १८०० कोटी रुपये थेट त्यांच्या खात्यात जमा होतील, ज्यामुळे बँकेच्या कर्जाचे ओझे कमी होईल, असे वाटले होते. पण अद्याप निधी मिळालेला नाही. अद्याप केवळ १८०० कोटींपैकी ९०० कोटी आवंटीत झाले असल्याने शेतकऱ्यांमध्ये हा बोनस प्रत्यक्षात मिळालेला नाही.याबाबत आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभेत लक्ष वेधले.

यासोबतच,नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांनी धान विक्री केली असो वा नसो, तरीही शेतकऱ्यांना धानाच्या बोनसची प्रोत्साहनपर रक्कम हेक्टरी २० हजार प्रमाणे, दोन हेक्टरच्या मर्यादेत देण्याचे शासनाने स्पष्ट केले होते. तो निधीही अद्याप शेतकऱ्यांच्या मिळालेला नाही. त्यामुळे तात्काळ निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी आ. सुधीर मुनगंटीवार विधानसभेत केली.

याच पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'वन नेशन, वन डिस्ट्रिक्ट, वन प्रॉडक्ट' या संकल्पनेत चंद्रपूर जिल्ह्याची धान उत्पादक जिल्हा म्हणून नोंद झाली असून, राज्याचे सरासरी उत्पादन हेक्टरी २० क्विंटल असताना चंद्रपूर जिल्ह्याचे उत्पादन ११ ते १३ क्विंटल दरम्यान असल्याने उत्पादन वाढीसाठी विशेष योजनांची गरज आहे. आजच्या पुरवणी मागणीत जरी यासाठी तरतूद नसली, तरी ती डिसेंबरमध्ये करण्यात यावी, असेही त्यांनी नमूद केले.

# सावली तालुक्यातील पाणी पुरवठा योजना पूर्ववत सुरु करा

## सावली तालुका कॉंग्रेस कमिटीची मागणी

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**सावली, दि. ८ जुलै :** सावली तालुक्यात एकूण पाच प्रादेशिक पाणी पुरवठा कार्यरत असून सदरच्या पाचही पाणी पुरवठा योजना १ जूलै २०२५ पासून बंद पडलेल्या असल्यामुळे सामान्य जनतेला पिण्याचे पाणी मिळणे दुरापास्त झाल्याची परीस्थिती सावली तालुक्यात निर्माण झाली आहे. प्रादेशिक पाणी पुरवठा योजना पूर्ववत सुरु करण्यात यावी.अशी मागणी सावली तालुका कॉंग्रेस कमिटीच्या शिष्टमंडळाने मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद चंद्रपूर तथा कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग चंद्रपूर यांना दिलेल्या निवेदनातुन केलेली आहे.

सावली तालूक्यामध्ये बोथली, व्याहाड खुर्द,व्याहाड बुज, साखरी, सोनापूर, या पाच प्रादेशिक पाणी पुरवठा योजना गेल्या अनेक वर्षापापून कार्यान्वीत आहेत. शासनाने दिनांक ३० जुन २०२५ पासून सदर योजना बंद करून ती ग्रामपंचायतला चालविण्याचे निर्देश दिलेले आहेत. मात्र ग्रामपंचायत प्रशासनाने सदर शिखर समिती स्थापन करून पाणी पुरवठा योजना चालविण्यास नकार दिलेला आहे.ग्रामपंचायत आर्थिक दृष्ट्या सक्षम नाहीतः ग्रामपंचायतकडे उत्पनाचे दूसरे कुठलेही साधन नाही. लोकांच्या गृह करावरील रकमेतून ग्रामपंचायतचा कार्यभार चालविल्या जातो.पाणी पुरवठ्याची रक्कम सामान्य




पाणीकर म्हणून वर्षाकाठी १२०० रुपये जनतेकडून ग्रामपंचायतच्या मार्फतीने घेतल्या जातो.

साधारणता वर्षाला ३.५० ते ४ लाख रुपयापर्यंत सामान्य पाणी पटीची रक्कम जमा होत असते. एवढ्या लहान रक्कमेत पाणी पुरवठा योजना ग्रामपचायतीच्या माध्यमातून चालविणे कठिण आहे.त्यातही सामान्य पाणी पट्टीची पूर्ण वसुलि होणे शक्य नाही.ग्रामपंचायती आर्थिक दृष्टीने सक्षम नसल्यामुळे पाणी पुरवठाीं योजना राबवु शकणार नाही. जमा बाजु व खर्च बाजु यात मोठी तफावत आहे.शिखर समिती स्थापन करून ग्रामपंचायती स्वतःच पाणी पुरवठा योजना चालव्यात असे शासनाने निर्देश असल्यामुळे ग्रामपचायत प्रशासनासमोर मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. नौकर पगार, मोटार दुरुस्ती, ब्लिचिंग पावडर खरेदी,विद्युत बिल असा संपूर्ण महिन्याचा खर्च जवळपास २ लाख रुपये येत असतो.एवढा पैसा आणायचा कुठून असा प्रश्न ग्रामपंचायत प्रशासनासमोर पडलेला आहे. सद्या ग्रामपंचायत प्रशासनाच्या माध्यमातून पाणी पुरवठा योजनेचे विद्युत बिल भरण्यात येत आहे. ग्रामपंचायत प्रशासन कसेबसे विद्युत बिल भरताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. यात पुन्हा बाकी गोष्टी समाविष्ट केल्यामुळे ग्रामपंचायत प्रशासनावर भार वाढलेला आहे. जिल्हा परिषद येथून प्रादेशिक पाणी पुरवठा योजना पंजीकृत ठेकेदारांच्या माध्यमातून चालविल्या जात होती. मात्र अचानक ठेकेदारी पद्धत बंद केल्यामुळे ग्रामपंचायत प्रशासनासमोर धर्मसंकट उभे ठाकलेले आहे.

दरम्यान आ. विजय वडेट्टीवार यांनी या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देऊन या पावसाळी अधिवेशनात प्रश्न उचलणार असल्याचे सांगितले आहे.पूर्ववत पाणी पुरवठा योजना सुरु करण्यात येईल अशी भूमिका घेतलेली आहे.दरम्यान सावली तालुक्यातील पाचही पाणी पुरवठा योजना सुरु करण्याबाबतचे निवेदन कॉंग्रेसच्या शिष्टमंडळाने जिल्हा प्रशासनास देऊन या बाबत चर्चा केली असता जिल्हा प्रशासनाने यावर चर्चा करून तोडगा काढण्याचे आश्वासन दिलेले आहे. शिष्टमंडळात सावली तालुका कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष नितीन गोहने, बोथलीचे उपसरपंच विजय गड्डमवार,चकपिरंजीचे उपसरपंच अरविंद भैसारे यांची उपस्थित होते.

# आयएमए चंद्रपूर शाखेचं महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या निर्णया विरोधात तीव्र आंदोलन

## जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर



**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ८ जुलै :** इंडियन मेडिकल असोसिएशन (IMA) चंद्रपूर शाखेने महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने (MMC) ३० जून २०२५ रोजी जारी केलेल्या वादग्रस्त अधिसूचनेचा तीव्र निषेध नोंदवला आहे. या अधिसूचनेनुसार, केवळ एका वर्षाचा Certificate Course in Modern Pharmacology (CCMP) पूर्ण केलेल्या होमिओपॅथिक डॉक्टरांना MMC मध्ये नोंदणीची परवानगी देण्यात आली आहे.

IMA च्या मते, हा निर्णय संपूर्ण आधुनिक वैद्यकीय शिक्षणव्यवस्थेचा व नैतिकतेचा अवमान करणारा असून रुग्णांच्या आरोग्याशी गंभीर धोका निर्माण करणारा आहे. या पार्श्वभूमीवर आज दिनांक ८ जुलै २०२५ रोजी IMAचंद्रपूर शाखेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले.या शिष्टमंडळात डॉ. रितेश दीक्षित अध्यक्ष, IMAचंद्रपूर डॉ. मंगेश गुलवाडे माजी उपाध्यक्ष, IMA महाराष्ट्र राज्य, डॉ. दीपक निलावार, डॉ. नरेंद्र कोलते, डॉ. कल्पना गुलवाडे, डॉ. प्रसाद पोटदुखे, डॉ. अनुप पालीवाल, डॉ. भूपेश भलमे, डॉ. नगीना नायडू, डॉ. सुधीर रेगुंडवार डॉ. सुश्रुत भुकते सचिव, चंद्रपूर,डॉ. स्नेहल पोटदुखे, डॉ. हर्ष मामीडवार, डॉ अभय राठोड डॉ राहुल सैनानी डॉ. अप्रतिम दीक्षित आदि उपस्थित होते.

# नागभीड तालुक्यातील ग्रामपंचायत आरक्षण सोडत,५६ पैकी २९ ग्रा.पं.वर महिला सरपंच पदी आरूढ होणार

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**नागभीड, दि. ८ जुलै :** नागभीड तालुक्यातील ग्रामपंचायत आरक्षण सोडत,५६ पैकी २९ ग्रा.पं.वर महिला सरपंच पदी आरूढ होणारअसून २७ पदे ही पुरुष असणार आहेत.

तालुक्यातील ५६ ग्रामपंचायतीत अनु जाती करिता सात (७) . अनु जमाती (११) . नागरिकांचा मागास प्रवर्ग करिता १५ तर खुला प्रवर्ग २३ आहेत.

यापैकी २९ महिला राखीव असून अनु जाती महिला चार (४), अनु जमाती (६) , नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला राखीव (७) तर खुल्या जागांवर १२महिला राखीव ठेवण्यात आल्या आहेत. तालुक्यातील महिला आरक्षण हे ५० टक्केपेक्षा जास्त झाले असून महिला राज निर्माण होण्याचे संकेत मिळत आहे. नागभीड येथील तहसील कार्यालयात आज दुपारी दोन वाजता तालुका निवडणूक अधिकारी तथा तहसीलदार प्रताप वाघमारे, नायब तहसीलदार कावळे, निवडणूक प्रभारी अधिकारी मॅडम, आणि विविध पक्षाचे राजकीय प्रतिनिधी उपस्थित होते.१९९१ पासून तर २०११ ची जनगणना लक्षात घेत आणि सध्याचे आरक्षण विचारात घेत ईश्वर चिठ्ठीने आरक्षण सोडत करण्यात आली यावेळी सर्वांचे तहसीलदार यांनी सोडतीचे सूत्र जाहीर करून तालुक्यातील ५६ग्रामपंचायतीचे आरक्षण सोडत करण्यात आले असून त्याची पुढील ग्रामपंचायत निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे.

# बांधकाम कामगारांच्या समस्यांसाठी ९ जुलैला जिल्हाधिकारी कार्यालयावर वंचित बहुजन महिला आघाडीचा धडक मोर्चा

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ८ जुलै :** जिल्ह्यातील बांधकाम कामगारांना उपलब्ध असलेल्या सुविधांपासून जाणूनबुजून वंचित ठेवून, बोगस बांधकाम कामगारांना योजनेचा लाभ दिला जात आहे. संबंधित अधिकारी कामगारांच्या ९० दिवसांच्या नाका प्रमाणपत्रावर स्वाक्षरी करण्यास नकार देत आहेत. त्यामुळे त्यांना कोणताही लाभ मिळत नाही. कामगारांवर होणाऱ्या या अन्यायाविरुद्ध ९ जुलै रोजी दुपारी १२ वाजता गांधी चौकातील महानगरपालिका पासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत मोर्चा काढण्यात येत असल्याची माहिती जिल्हाध्यक्षा कविता गौरकर यांनी दिली.

केंद्र सरकारने चार कामगार संहिता मंजूर केल्या. परंतु या संहितांमध्ये बांधकाम कामगारांशी संबंधित सर्व कायद्यांना केराची टोपली दाखवून कामगार संहितेच्या सामाजिक सुरक्षेकडे दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे हे कामगार अडचणीत असल्याचे त्यांनी सांगितले. कामगारांना ९० दिवसांचा नाका प्रमाणपत्र मिळतो पण ग्रामसेवक, ग्रामपंचायत सचिव किंवा संबंधित अधिकाऱ्यांनी त्यावर सही करण्यास नकार दिला आहे. अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीशिवाय कामगारांना काम मिळत नाही. त्यामुळे अनेक कामगारांना रोजगारापासून वंचित ठेवले जात आहे. बांधकाम कामगारांना जिल्हा पातळीवर साहित्य दिले जात आहे. हे साहित्य त्यांना तहसील पातळीवर देण्यात यावे, नोंदणीकृत कामगारांना योजनेचे लाभ तात्काळ




देण्यात यावे, जनविरोधी महाराष्ट्र विशेष सार्वजनिक सुरक्षा विधेयक २०२४ तात्काळ रद्द करावे, बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या भ्रष्टाचाराची चौकशी करावी इत्यादी मागण्यांसह कामगारांवर होणाऱ्यां अन्यायाविरुद्ध हा मोर्चा काढण्यात आला आहे अशी माहिती गौरकर यांनी दिली आहे.

या मोर्चात वंचित बहुजन महिला आघाडीला निर्माण कामगार संघटना कृती समिती आणि शिवराज्य कामगार संघटनेने पाठिंबा जाहीर केला आहे. महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा कविता गौरकर यांनी बांधकाम कामगार, पुरुष आणि महिलांना संघटित मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. पत्रकार परीषदेला कविता गौरकर, सरचिटणीस आलका मोटघरे, अवंतिका उके, ललिता गेडाम, प्रमोद बोरघाटे आदी उपस्थित होते.

मध्य रेल्वे
ई-निविदा सूचना
ई-निविदा माहिती क्रमांक: NGP/C/CP/e-auction/publish/2025-13, तारीख: ०७.०७.२०२५, नागपूर विभागातील एनएफआर कंत्राटांसाठी ई-लिलाव खालीलप्रमाणे आमंत्रित करण्यात येत आहे. कॅटलॉग क्रमांक: NGP-MISC-25-05. १. बल्लारशाह रेल्वे स्थानकाच्या फिरत्या क्षेत्रात एटीएम रचनेत ३ वर्षांच्या कालावधीसाठी मोबाईल आणि ॲक्सेसरीज कियोस्कची तरतूद. २५.०७.२५ रोजी १५:००:०० वाजता सुरू. २५.०७.२५ रोजी १५:३०:०० वाजता समाप्त २. चंद्रपूर रेल्वे स्थानकाच्या परिसंचरण क्षेत्रात एटीएम रचनेअंतर्गत ३ वर्षांच्या कालावधीसाठी मोबाईल आणि ॲक्सेसरीजसाठी कियोस्कची तरतूद. २५.०७.२५ रोजी १५:००:०० वाजता सुरू. २५.०७.२५ रोजी १५:४०:०० वाजता समाप्त ३. वरोरा रेल्वे स्थानकाच्या फिरत्या क्षेत्रात एटीएम रचनेअंतर्गत ३ वर्षांच्या कालावधीसाठी किराणा आणि फोटोकॉपी केंद्राची तरतूद. २५.०७.२५ रोजी १५:००:०० वाजता सुरू. २५.०७.२५ रोजी १५:५०:०० वाजता समाप्त ४. पांढुर्णा रेल्वे स्थानकाच्या फिरत्या क्षेत्रात एटीएम रचनेअंतर्गत ३ वर्षांच्या कालावधीसाठी किराणा आणि फोटोकॉपी केंद्राची तरतूद. २५.०७.२५ रोजी १५:००:०० वाजता सुरू. २५.०७.२५ रोजी १६:००:०० वाजता समाप्त ५. आमला रेल्वे स्थानकाच्या फिरत्या क्षेत्रात एटीएम रचनेअंतर्गत ३ वर्षांच्या कालावधीसाठी किराणा आणि फोटोकॉपी केंद्राची तरतूद. २५.०७.२५ रोजी १५:००:०० वाजता सुरू. २५.०७.२५ रोजी १६:१०:०० वाजता समाप्त. अधिक माहितीसाठी कृपया www.ireps.gov.in ला भेट द्या.
ACM (TC),
DE/119 Central Railway, Nagpur
अपने जानवरों को रेल लाइन से दूर रखे

# राजुरा तालुक्यात यंदा २७ हजार हेक्टरवर कापसाची लागवड

## मागील वर्षीच्या तुलनेत कापसाचा पेरा वाढला...

**महासागर तालुका प्रतिनिधी**



**राजुरा, दि. ८ जुलै :** यंदाच्या खरीप हंगामात राजुरा तालुक्यात कापसाची लागवड लक्षणीयरीत्या वाढली असून सुमारे २७ हजार हेक्टर क्षेत्रावर कापसाची पेरणी झाल्याची माहिती कृषी विभागाने दिली आहे. मागील वर्षीच्या तुलनेत यंदा कापसाचा पेरा वाढला असून खरीप हंगामात शेतकऱ्यांचा कल पुन्हा कापसाकडे वळताना दिसत आहे.

राजुरा तालुक्यात खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच पावसाने हुलकावणी दिली.त्यामुळे शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत असतांनाच तालुक्यात समाधानकारक पाऊस झाला. त्यामुळे शेतकऱ्यांनी योग्य वेळ साधून नगदी पीक समजल्या जाणाऱ्या कापसाची पेरणी केली आहे. यंदा बाजारपेठेत कापसाला चांगला दर मिळेल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांना आहे.मागील वर्षीच्या तुलनेत यंदा राजुरा तालुक्यात २७ हजार सातशे सात हेक्टरवर कापसाची लागवड केली असल्याची माहिती कृषी विभागाने दिली आहे.

तालुक्यातील अनेक गावांमध्ये शेतकरी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कापसाची लागवड करत आहेत. काही ठिकाणी जैविक पद्धतीने शेती केली जात असून, काही शेतकरी ड्रिप सिंचन, ट्रॅक्टरवर अवलंबून मशागत आदी आधुनिक साधनसामग्रीचा वापर करीत शेतकऱ्यांनी शेती केली आहे.

कृषी विभागाने कापसाच्या उत्पादनासाठी आवश्यक असलेली मार्गदर्शक तत्वे, बियाण्यांची निवड, खते व कीड नियंत्रण यासंदर्भात शेतकऱ्यांना वेळोवेळी माहिती दिली आहे. त्यामुळे यंदा कापसाचे उत्पादनही चांगले होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.दरवर्षी निसर्गाची अवकृपा,शासनाचे शेतकऱ्यांविषयी उदासीन धोरण यामुळे शेतकरी महागाईच्या काळात तग धरू शकत नाही.नापिकी,कर्जबाजारीपणा यामुळे शेतकऱ्यांची होरपळ मोठ्या प्रमाणात होत आहे.मात्र बाजारपेठेत शेतमालाला चांगला दर मिळाला तर शेतकरी समृध्द होईल,ही आशा ठेऊन शेतकऱ्यांनी यंदा खरीप हंगामात कापसाची लागवड केली आहे.

> राजुरा तालुक्यात खरीप हंगामात यंदा २७ हजार सातशे सात हेक्टरवर कापसाची लागवड केली आहे. मागील वर्षीच्या तुलनेत यंदा कापसाचे क्षेत्र वाढले आहे. शेतकऱ्यांनी ३१ जुलै पर्यंत शेतीचा विमा तसेच ३१ ऑगस्ट पर्यंत ई पीक पाहणी व फार्मर आयडी काढून घ्यावी.
>
> **विनायक पायघन, तालुका कृषी अधिकारी, राजुरा**

> कापूस शेतकऱ्यांचे नगदी पीक आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी यंदा चांगला दर मिळेल या आशेवर कापसाची लागवड केली आहे. निसर्गाने साथ दिल्यास आणि शासनाने शेतमालाला योग्य दर दिल्यास कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळेल.
>
> **प्रमोद लांडे, कापूस उत्पादक शेतकरी, गोवरी**

# गोंडपिपरी तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी प्रसेनजीत डोंगरे, सचिवपदी प्रमोद दुर्गे यांची निवड

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**गोंडपिपरी, दि. ८ जुलै :** गोंडपिपरी तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी प्रसेनजीत डोंगरे तर सचिवपदी प्रमोद दुर्गे यांची एकमताने निवड करण्यात आली. गोंडपिपरी तालुका पत्रकार संघाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. पत्रकार संघाच्या कार्यकारिणीत सचिन फुलझेले, समीर निमगडे,बाबुराव बोंडे, नितेश डोंगरे,चंद्रजीत




गव्हारे, सुरज माडूरवार,दिपक वांढरे, आशिष निमगडे,नितीन पुददटवार, दिलीप बच्चुवार,प्रशांत कोसनकर,रूपेश निमसरकार अदिंचा समावेश करण्यात आला आहे.संघाच्या जेष्ठ मार्गदर्शकपदी पत्रकार संदीप रायपूरे,अरूण वासलवार यांचा समावेश करण्यात आला आहे.

# भारताला त्याचे गुन्हेगार मिळतील का?

**सिंधू नदीत भारताचे रक्त सांडण्याची भाषा करणारे बिलावल भुट्टो यांनी यू-टर्न घेतला आहे. त्यांनी एका मुलाखतीत म्हटले होते की, जर भारताने सहकार्य केले तर पाकिस्तान दहशतवादी हाफिज सईद आणि मसूद अझहरला भारताच्या स्वाधीन करण्यास तयार आहेत. बिलावल यांच्या विधानाने हाफिज सईदचा दहशतवादी मुलगा संतापला.**
**पाकिस्तान खरोखरच दोषी दहशतवाद्यांना भारताच्या स्वाधीन करेल का, या प्रत्यार्पणातील मुख्य अडथळे कोणते आहेत? आणि बिलावल यांच्या विधानाचा खरा खेळ काय आहे?**

--------------

पाकिस्तानच्या राष्ट्रीय दहशतवाद विरोधी प्राधिकरण NACTA नुसार, हाफिज सईद आणि मसूद अझहर दहशतवादी पाकिस्तानमध्ये बंदी आहेत. तरीही, असे दहशतवादी पाकिस्तानमध्ये मुक्तपणे फिरतात आणि त्यांच्या संघटना चालवतात. पाकिस्तानी सैन्य आणि गुप्तचर संस्था देखील त्यांना मदत करतात.
यासंबंधी एका प्रश्नावर, पाकिस्तानचे माजी परराष्ट्र मंत्री आणि पाकिस्तान पीपल्स पार्टी (पीपीपी) चे अध्यक्ष बिलावल भुट्टो यांनी कतार मीडिया अल जझीराला दिलेल्या मुलाखतीत म्हटले की, जर भारताने यामध्ये सहकार्य केले तर पाकिस्तान हाफिज सईद आणि मसूद अझहर यांना भारताकडे प्रत्यार्पण करण्यास तयार आहे.
पाकिस्तानमध्ये या दहशतवाद्यांवर सुरू असलेले खटले. पाकिस्तानशी संबंधित प्रकरणे, म्हणजेच दहशतवादी. निधीशी संबंधित आहेत. भारताच्या असहकार धोरणामुळे सीमापार दहशतवाद प्रकरणांमध्ये हाफिज सईद आणि मसूद अझहर यांना शिक्षा मिळणे कठीण आहे.
भारत काही मूलभूत कायदेशीर बाबींमध्ये सहकार्य करत नाही. जसे की पुरावे देणे, भारतीय साक्षीदारांना न्यायालयात हजर राहणे आणि आरोपांना सामोरे जाणे. जर भारताने यामध्ये मदत केली तर अशा लोकांना भारताकडे सोपवण्यात कोणताही अडथळा येणार नाही.

दहशतवाद्यांना पकडण्याचे भारताचे धोरण आता 'नव्याने असामान्य' बनले आहे. हे ना पाकिस्तानच्या हिताचे आहे ना भारताच्या हिताचे. बिलावल भुट्टो म्हणाले की, दहशतवाद्यांना भारताच्या ताब्यात देण्यास आम्हाला कोणतीही अडचण नाही.

भारत अनेकदा हाफिज सईद आणि मसूद अझहर सारख्या दहशतवाद्यांच्या कारवायांचे पुरावे देतो. त्यांना पाकिस्तानला सोपवण्यात आले आहे, परंतु कोणतीही कारवाई केलेली नाही किंवा ती फक्त दिखाव्यासाठी आहे. कारवाई करण्यात आली आहे. काही उदाहरणे...

**१. २००१ मध्ये संसदेवर हल्ला:**
भारताने जैश-ए-मोहम्मदचा संस्थापक मसूद अझहर याला या हल्ल्याचा सूत्रधार म्हणून घोषित केले. आणि हल्ल्याशी संबंधित कागदपत्रे, फोन रेकॉर्ड आणि इतर गुप्त माहिती पाकिस्तानला दिली. पाकिस्तानने मसूद अझहरला ताब्यात घेतले होते, परंतु नंतर त्याला सोडून दिले. कोणतीही ठोस कायदेशीर कारवाई करण्यात आली नाही.

**२. २००८ चा मुंबई हल्ला:**
भारताने लष्कर-ए-तैयबा (एलईटी) चा प्रमुख हाफिज सईदला या हल्ल्याचा सूत्रधार मानले. अनेक पुरावे पाकिस्तानला देण्यात आले. जसे की अजमल कसाबचा कबुलीजबाब, कॉल रेकॉर्ड, सॅटेलाइट फोन आणि जीपीएस डेटा. हाफिज सईदला काही काळ नजरकैदेत ठेवण्यात आले, परंतु कोणतीही ठोस शिक्षा देण्यात आली नाही.

**३. २०१६ चा पठाणकोट हल्ला:**
भारताने या हल्ल्यासाठी आणि फोन कॉलसाठी जैश-ए-मोहम्मदला जबाबदार धरले, दहशतवाद्यांची ओळख आणि त्यांच्या ठिकाणांशी संबंधित पुरावे पाकिस्तानला देण्यात आले. पाकिस्तानने संयुक्त तपास पथक पाठवले, परंतु तपासात कोणतीही ठोस प्रगती झाली नाही आणि मसूद अझहरवर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही.

न्यूयॉर्क टाईम्सच्या वृत्तानुसार, हाफिज सईद पाकिस्तानात मुक्तपणे फिरत आहे. तथापि, बिलावल भुट्टो यांनी अल जझीराला




दिलेल्या मुलाखतीत म्हटले होते की, 'हाफिज सईद मुक्त नाही, तो पाकिस्तानच्या ताब्यात आहे.'

हाफिज सईदला २०१९ मध्ये दहशतवादी निधीच्या आरोपाखाली अटक करण्यात आली होती आणि २०२० मध्ये त्याला ३३ अंतर्गत अटक करण्यात आली होती. त्याला एक वर्षाची शिक्षा सुनावण्यात आली होती. तो लाहोरच्या कोट लखपत तुरुंगात आहे. जून २०२२ मध्ये काही पाकिस्तानी पत्रकारांनी म्हटले होते की हाफिज सईदला FATF मध्ये काळ्या यादीत टाकले जाणार आहे.

जैश-ए-मोहम्मदचा संस्थापक मसूद अझहर कुठे आहे याबद्दल बिलावल म्हणाले, 'आम्हाला वाटते की मसूद अझहर अफगाणिस्तानात आहे. पाकिस्तान मसूदला ओळखण्यात किंवा अटक करण्यात अयशस्वी ठरला आहे. जर भारताने तो पाकिस्तानात असल्याचा पुरावा दिला तर आम्ही त्याला आनंदाने अटक करू.'

मीडिया रिपोर्ट्सनुसार, मसूद अझहरचे लपण्याचे ठिकाण पाकिस्तानातील बहावलपूरमध्ये आहे, जिथे जैश-ए-मोहम्मदचे मुख्यालय 'सुभानअल्लाह' आहे. भारताने अनेक वेळा मसूद पाकिस्तानात असल्याचे पुरावे दिले आहेत, परंतु पाकिस्तानने प्रत्येक वेळी ते नाकारले आहे. २०२४ मध्ये, बहावलपूरमध्ये एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, ज्यामध्ये मसूदने भारतविरुद्ध विधाने केली होती.

डिसेंबर २०२४ मध्ये, मीडिया रिपोर्ट्समध्ये असा दावा करण्यात आला होता की मसूद अझहरला हृदयविकाराचा झटका आला होता. त्यानंतर त्याला अफगाणिस्तानातून पाकिस्तानला हलवण्यात आले. तथापि, याची पुष्टी झाली नाही. भारताच्या ऑपरेशन सिंदूरमध्ये जैशच्या मुख्यालयावर हल्ला करण्यात आला, ज्यामध्ये मसूदचे १० नातेवाईक मारले गेले.

परराष्ट्र व्यवहार तज्ज्ञ आणि जेएनयूचे प्राध्यापक डॉ. राजन कुमार यांच्या मते, पाकिस्तान सरकारच्या बिलावल भुट्टो यांनी हाफिज सईद आणि मसूद अझहर यांना भारताकडे सोपवले नाही. त्यांना सोपविण्याचा अधिकार नाही. दहशतवाद्यांना भारताकडे सोपवण्याबद्दल बिलावल भुट्टो जे म्हणत आहेत ते सत्यापासून दूर आहे. पाकिस्तान कोणत्याही परिस्थितीत या दहशतवाद्यांना भारताकडे सोपवणार नाही. यामागे अनेक अडथळे आहेत...

हाफिज सईद आणि मसूद अझहरसारखे दहशतवादी पाकिस्तानच्या दोन मोठ्या जिहादांमध्ये सहभागी होते. एक म्हणजे 'अफगाण जिहाद' आणि दुसरा म्हणजे 'काश्मीर जिहाद'. हे पाकिस्तानच्या खुल्या धोरणाखाली घडले, ज्यामुळे सईद आणि अझहर यांना पाकिस्तानच्या गुप्त माहितीपर्यंत पोहोच मिळाली. ही माहिती भारताच्या हाती पडू नये असे पाकिस्तानला वाटते.

१९४८ पासून पाकिस्तानमध्ये 'काश्मीर' बद्दल एक भावना आहे. हाफिज सईद आणि मसूद अझहरसारखे दहशतवादी नेहमीच 'आझाद काश्मीर' च्या घोषणा देत आले आहेत. अशा परिस्थितीत जर पाकिस्तान सरकारने या दोघांना भारताच्या स्वाधीन केले तर जनता असा प्रश्न उपस्थित करेल की काश्मीर मुक्त करण्यासाठी ज्या लोकांनी कठोर परिश्रम केले त्यांना भारताच्या स्वाधीन करण्यात आले आहे. यामुळे जनतेला असा संदेशही जाईल की पाकिस्तानने भारतासमोर शरणागती पत्करली आहे.

बिलावल भुट्टोच्या प्रत्यार्पणाच्या विधानावर हाफिज सईदचा मुलगा तल्हा सईद म्हणाला, 'हाफिज सईदचे कोणतेही काम पाकिस्तानविरुद्ध नाही. बिलावलचे विधान जागतिक स्तरावर पाकिस्तानची प्रतिमा खराब करणार आहे. कोणताही नेता आपल्या नागरिकांना शत्रू देशाच्या ताब्यात देण्याबद्दल बोलू शकतो का?'

२००७ ते २०२५ पर्यंत, पाकिस्तानमध्ये तहरीक-ए-तालिबान म्हणजेच टीटीपी विरुद्ध मोठे युद्ध झाले. टीटीपीचा उद्देश खैबर पख्तूनख्वाला पाकिस्तानपासून वेगळे करणे आहे. जर पाकिस्तानने लष्कर आणि जैशबद्दल चुकीचे धोरण स्वीकारले तर या दोन्ही संघटना टीटीपी आणि पाकिस्तानी सैन्याशी हातमिळवणी करतील.

बिलावल भुट्टो यांनी काहीही दावे केले असले तरी, भारताचे गुन्हेगार सहजासहजी हाती येणार नाहीत.

■ ■ ■

# बंगालमध्ये भाजपाची वेगळी रणनीती!

रा. स्व. संघ, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद आणि भारतीय जनता युवा मोर्चा या संघटनांमध्ये सुरुवातीला कार्यरत असलेल्या, समीक भट्टाचार्य यांची नुकतीच पश्चिम बंगाल भाजपा प्रदेशाध्यक्षपदी निवड झाली आहे. तपन सिकदर, राहुल सिन्हा, दिलीप घोष आणि सुकांता मुजुमदार यांच्या नंतर प्रदेशाध्यक्षपदी आता समीक भट्टाचार्य यांची निवड झाली आहे.


अभय गोखले

समीक भट्टाचार्य हे अटल बिहारी वाजपेयी यांच्या प्रमाणे उदारमतवादी आहेत. त्यांच्या सर्व समावेशक वृत्तीमुळे ते पक्षामध्ये सर्वांशी चांगले संबंध राखून आहेत. सध्या ते राज्यसभेचे खासदार आहेत.अतिशय अभ्यासू आणि मीतभाषी असलेले, समीक भट्टाचार्य हे बंगाल मधील भद्रलोक (उच्च विद्याविभूषित) बरोबर चांगला संवाद राखून आहेत.

२०१४ साली त्यांनी भाजपाच्या तिकिटावर बशिरहाट (दक्षिण) विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीत विजय मिळवून सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला होता. ममता बॅनर्जी यांच्या राजवटीत एखादी पोटनिवडणुक जिंकणे ही विरोधी पक्षांसाठी सोपी गोष्ट नाही. त्यामुळेच समीक भट्टाचार्य यांचा विजय विशेष महत्त्वाचा मानला गेला.

त्या काळात पश्चिम बंगाल मध्ये भाजपा,आजच्या इतकी प्रबळ नव्हती, ही गोष्ट या ठिकाणी लक्षात घ्यायला हवी. भाजपाचे नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष म्हणून समीक भट्टाचार्य यांच्या समोर बरीच आव्हाने आहेत. पश्चिम बंगाल भाजपामध्ये मुळचे कार्यकर्ते आणि नेते व बाहेरून आलेले नेते व कार्यकर्ते असा सुप्त संघर्ष आहे. उदाहरण द्यायचे झाल्यास भाजपाचे माजी प्रदेशाध्यक्ष दिलीप घोष यांचा उल्लेख करता येईल.

दिलीप घोष हे पश्चिम बंगाल भाजपाचे आजवरचे सर्वात यशस्वी प्रदेशाध्यक्ष मानले जातात. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत दिलीप घोष यांच्या नेतृत्वाखाली भाजपाने पश्चिम बंगाल मधील लोकसभेच्या एकूण ४२ जागांपैकी १८ जागा जिंकून ममता बॅनर्जी यांना मोठाच धक्का दिला होता. त्या निवडणुकीत भाजपा आणि तृणमूल कॉंग्रेस यांना मिळालेल्या मतांच्या टक्केवारीत फारसा फरक नव्हता. विशेष म्हणजे मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डावी आघाडी आणि कॉंग्रेस या पश्चिम बंगाल मधील प्रस्थापित पक्षांना खूप मागे सारून भाजपाने, सत्ताधारी तृणमूल कॉंग्रेस पाठोपाठ दुसरा क्रमांक पटकावला होता.

आज काय स्थिती आहे? भाजपाला पश्चिम बंगाल मध्ये इतका मोठा विजय मिळवून देणारे, दिलीप घोष एका बाजूला पडले आहेत.समीक भट्टाचार्य यांच्या निवडणुक प्रक्रियेत, दिलीप घोष कुठेच दिसले नाहीत. अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर,समीक भट्टाचार्य यांच्या सत्कार समारंभाला दिलीप घोष यांना आमंत्रित केले नव्हते असे म्हणतात.सत्कार समारंभात माजी अध्यक्ष सुकांता मुजुमदार यांनी दिलीप घोष यांनी पक्षाकरता घेतलेल्या मेहनतीचा उल्लेख केला, परंतु भाजपाचे पश्चिम बंगाल विधानसभेतील विरोधी पक्ष नेते सुवेंदू अधिकारी यांनी दिलीप घोष यांचा उल्लेख टाळला.भाजपामधील मुळचे नेते आणि बाहेरून आलेले नेते यांच्यातील फरक हाच आहे.

सुवेंदु अधिकारी हे तृणमूल कॉंग्रेसमधून भाजपात आलेले नेते आहेत.ते ममता बॅनर्जी यांचे उजवे हात समजले जात असत.ते मासबेस असलेले नेते आहेत. २०२१ मध्ये झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत, सुवेंदु अधिकारी यांनी ममता बॅनर्जी यांचा पराभव केला होता. ते आता कट्टर हिंदुत्ववादी झाले आहेत. समीक भट्टाचार्य यांनी सत्काराला उत्तर देताना केलेले भाषण भाजपा मधील अनेकांना आश्चर्याचा धक्का देणारे होते.ते म्हणाले आमचा लढा मुसलमानांच्या विरोधात नाही.मुस्लिम घरांतील जे तरुण हातात दगड घेतात त्यांच्या हातात आम्हाला पुस्तक द्यायचे आहे, जे तरुण हातात तलवार घेतात,त्यांच्या हातात आम्हाला पेन द्यायचे आहे. हिंसाचार आणि जातीयवाद हे आमचे खरे शत्रू आहेत.

समीक भट्टाचार्य यांनी मांडलेले हे विचार पक्षाच्या हिंदुत्ववादी भूमिकेला छेद देणारे असले तरी, त्यांची ही भूमिका भाजपाकरता कदाचित फायदेशीरही ठरू शकेल. आज पश्चिम बंगाल मध्ये अशी परिस्थिती आहे की, मुस्लिम समाजातील एक वर्ग ममता बॅनर्जी यांच्यावर कमालीचा नाराज आहे. परंतु भाजपाच्या भितीमुळे हा वर्ग नाईलाजाने ममता बॅनर्जी यांच्या पाठीशी उभा रहात आहे.पुढील वर्षी पश्चिम बंगाल मध्ये विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत.

तृणमूल कॉंग्रेसच्या काही नेत्यांची भ्रष्टाचाराची प्रकरणे एका पाठोपाठ एक बाहेर येत आहेत. बेरोजगारी मोठ्या प्रमाणात वाढली आहे.कायदा आणि सुव्यवस्थेचे धिंडवडे निघाले आहेत.लोकांना विकल्प हवा आहे.परंतु पश्चिम बंगाल मध्ये ३० टक्के लोकसंख्या असलेला मुस्लिम समाज जोपर्यंत ममतांच्या पाठीमागे ठामपणे उभा रहात आहे तोपर्यंत ममतांना पराभूत करणे अतिशय अवघड आहे.

समीक भट्टाचार्य यांनी मांडलेले विचार वास्तववादी आहेत.मात्र भाजपामध्ये बाहेरून आलेले नेते, त्यांना कशी साथ देतात हे महत्त्वाचे ठरणार आहे. समीक भट्टाचार्य यांना जुने आणि नवे यांची व्यवस्थित सांगड घालावी लागणार आहे. त्या करता त्यांना दिलीप घोष आणि सुकांता मुजुमदार या माजी अध्यक्षांचा सल्ला अतिशय मोलाचा ठरणार आहे. त्यांच्या समोरील आव्हान सोपे नाही, कारण त्यांची लढाई ममता बॅनर्जी यांच्याबरोबर आहे.

## आदीगुरु व्यास

गुरुपौर्णिमेच्या दिवशी प्रत्येक शिष्य आपल्या गुरूंचे पूजन करून त्यांना गुरुदक्षिणा देतात. या दिवशी व्यासपूजा करण्याची देखील प्रथा आहे. गुरुपरंपरेमध्ये महर्षी व्यासांना सर्वश्रेष्ठ गुरु मानले जाते. सर्व ज्ञानाचा उगम हा महर्षी व्यासांपासूनच होतो. त्यामुळेच व्यासोच्छिष्टम् जगत्सर्वम्‌ सर्व असे म्हटले जाते. याचा अर्थ असा होतो की, सर्व जगाचे ज्ञान व्यासांनी उष्टे केलेले आहे म्हणजेच व्यासांना ज्ञात नाही असे काहीच नाही. महर्षी व्यासांनी अठरा पुराणांची रचना करून भक्तीमार्ग सोपा केलेला आहे. व्यासांइतका हिंदु तत्त्वज्ञानाचा विस्तार अन्य कोणीही केलेला नाही. असा कोणताही व्यवहार नाही की, ज्याच्यावर महर्षी व्यासांनी मार्गदर्शन केले नाही. यासाठी सांस्कृतिक विचार ज्या पिठावरून मांडले जातात, व्यक्त केले जातात त्या पिठाला व्यासपीठ असे म्हणतात.

■ दिपाली गिते, नागपूर.

## गुरु तोचि देव!

वाचक लिहितात

आत्म्याचे परमात्म्याशी म्हणजेच प्राणिमात्राचे भगवंताशी मिलन घडवून आणतो तो गुरु. गुरु-शिष्य परंपरा हे पवित्र भारतीय संस्कृतीचे एक वेगळे वैशिष्ट्य आहे. 'सद्गुरू वाचोनि सापडेना सोय, धरावे ते पाय आधी त्याचे' हे संतवचन गुरूंचे जीवनातील अनन्यसाधारण महत्व प्रतीत करते.

व्यवहारातील लहानसहान कामामध्ये आपल्याला कोणाचे ना कोणाचे मार्गदर्शन घ्यावे लागते. रामायण-महाभारत काळापासून गुरूंचे महत्व किती असाधारण आहे हे आपण गोष्टींमधून, शालेय अभ्यासक्रमातून शिकत आलो आहोत. हिंदू धर्मात आज अनेक संप्रदाय आहेत, त्यांचे साधनामार्ग वेगळे आहेत; मात्र प्रत्येक मार्गातून भगवंतापर्यंत नेणारा सामायिक टप्पा हा 'गुरु' आहे. शालेय जीवनात शिक्षक हे गुरुस्वरूप असतात. विद्यार्थ्याला व्यावहारिक ज्ञान देऊन ते त्याला भौतिक जीवनात यशस्वी होण्यासाठी घडवत असतात.

आजमितीला विद्यार्थ्यांमधील शिक्षकांविषयी असलेला आदर कमी होऊ लागला आहे. शिक्षक रागावले म्हणून शिक्षकांचा सूड घेण्याचाही घटना घडू लागल्या आहेत. यासाठी शालेय जीवनापासून विद्यार्थ्यांच्या मनावर गुरूंचे महत्व बिंबवणे आवश्यक आहे.

■ सौ. मोक्षदा घाणेकर
काळाचौकी, मुंबई.

# संवादफेकीचा बेताज बादशहा!



हिंदी चित्रपट जगतामध्ये आपल्या दमदार अभिनयाच्या बळावर अनेकांनी प्रेक्षकांच्या मनावर राज्य केले. तथापि असाही एक अभिनेता होऊन गेला, ज्याला केवळ प्रेक्षकांनीच नव्हे तर संपूर्ण चित्रपटसृष्टीने ह्यराजकुमारह्ण मानले आणि ते म्हणजे डायलॉग किंग अर्थात संवादफेकीचा बेताज बादशहा कुलभूषण पंडित उर्फ राजकुमार. आज (३ जुलै ) त्यांचा स्मृतिदिन. खर्जातला आवाज, उंचेपुरे व्यक्तिमत्व आणि गळ्याभोवती हात फिरवून संवाद बोलण्याची अनोखी लकब ही राजकुमार यांची ओळख होती. ₹ हम अपना इस्तीफा जेब मे लेकर घुमते है, चौधरी !₹ हा त्यांचा सर्वात खतरनाक संवाद.

३ जुलै हा आपल्याच धुंदीत जगणाऱ्या आणि बॉलीवूड ने डोक्यावर घेतलेल्या संवादाचा बादशहा जानी राजकुमार या अभिनेत्याचा स्मृतिदिन. ८ ऑक्टोबर १९२६ ला बलुचिस्तान येथे जन्मलेल्या आणि सुरुवातीस मुंबईत पोलिस इन्स्पेक्टर ची नोकरी करणाऱ्या राजकुमारने (मूळ नाव कुलभूषण पंडित) शाही बाजार (१९५२) या चित्रपटाद्वारे सिनेसृष्टीत पाऊल ठेवल्यानंतर १९५७ ला आलेलया मेहबूब खानच्या मदर इंडिया या चित्रपटातील शेतकऱ्याच्या छोट्याशा भूमिकेने दर्शकांवर छाप पाडली.

त्यानंतर त्यांनी पैगाम, दिल अपना और प्रीत पराई, काजल, वक्त, पाकिजा, बुलंदी, नीलकमल, हमराज, मेरे हुजूर, हिर रांझा, सौदागर, तिरंगा आदी चित्रपटातून दमदार अभिनय आणि आपल्या विशिष्ट शैलीतील संवादफेकीने संपूर्ण चित्रपटसृष्टीवर राज्य केले. डायलॉग किंग अशी उपाधी मिळालेल्या राजकुमार यांचे ये बच्चों के खेलने की चीज नहीं, हाथ कट जाए तो खून निकलने लगता है, जिनके घर शीशे के बने होते हैं वो दूसरों पर पत्थर नहीं फेंकते (वक्त) आणि आपके पॉव बहुत खूबसूरत हैं, इन्हें जमीन पर मत रखिए, मैले हो जाएंगे (पाकीजा) हे त्याकाळी गाजलेले संवाद आजही अमर आहेत.

राजकुमार यांचे नाव घेतले की आठवतो तो त्यांचा भारदस्त आवाज आणि त्यांचे अजरामर डायलॉग. केवळ दृश्यच नव्हे तर चित्रपटाच्या पटकथाही राजकुमार यांना डोळ्यांसमोर ठेवूनच लिहिल्या जात असत. 'बुलंदी', 'सौदागर', 'तिरंगा', 'मरते दम तक' ही त्यातील काही उदाहरणे. बॉलिवूडच्या या राजकुमाराचे निधन ३ जुलै १९९६ रोजी झाले. पण अजरामर संवादांमुळे आजही ते सिनेरसिकांच्या हृदयात आहेत. त्यांना विनम्र आदरांजली !

-------------

■ प्रा. विजय कोष्टी
कवठे महांकाळ (सांगली)
9423829117

■ ■ ■

(कालच्या अंकावरून पुढे)

-------------

# सुज्ञ व जागृत पालक कोण?

मुलांना जिल्हा परिषद शाळेत टाकून त्याच्या दरवर्षी च्या फि वरचा खर्च जरी बचत केला तर मुलाचे पदवी पर्यंत चे शिक्षण होईपर्यंत लाखों रुपयांची बचत होते. शिक्षणा दरम्यान मुलांमध्ये विकसित झालेल्या कौशल्याच्या आधारे त्याला उपजिविका करण्याचा मार्ग मिळाला तर उत्तम नाहीतर त्याचे बचत केलेले पैसे त्यालाच देऊन व्यवसाय सुरू करून स्वतःचा उदरनिर्वाह करण्यासाठी प्रोत्साहन देणे म्हणजे सुज्ञ व जागृत पालक होत.

श्रीमंताची किंवा सरकारी नोकरदारांची मुले खाजगी शाळेत जातात मग माज्या ही मुलाने खाजगी शाळेत जावे हा विचार डोक्यात येणे म्हणजे आपण अहंकारी व खोट्या मानसन्मानाच्या मागे धावणारे आणि नसलेल्या स्टेटसचा विचार करणारे पालक आहोत हेच सिद्ध होते.

महागडी शाळा महागडे खाजगी शिकवणी यातून नेमकं काय साध्य होते? कर्ज काढून, इच्छा मारून इतर करतात म्हणून आपणही निरर्थक पैसा खर्च करण्याला श्रीमंत, सुज्ञ नाही तर वैचारिक दरिद्री व अडाणी म्हणतात. आजकाल खाजगी शिकवण्या लावणे ही फॅशन झाली आहे.

सर्वच विषयांचे बहुतांश सर्वच विद्यार्थी खाजगी शिकवणीकडे वळले. पण खाजगी शिकवणीची सर्वच विद्यार्थ्यांना सर्वच विषयांची गरज आहे का? हा साधा प्रश्न ही डोक्यात येऊ नये म्हणजे किती मोठे बौद्धिक दरिद्री असेल. खाजगी शिकवणी लावायला पाहिजे पण कधी?

तर एखादा विषय खरचं एखाद्या विद्यार्थ्यांला जमत नसेल तर त्या विषयाचे ज्ञान व्हावे म्हणून शिकवणी ठिक आहे. कारण शाळेत शिक्षण प्रत्येक विद्यार्थ्यांवर पाहिजे तसे लक्ष जास्त विद्यार्थी असल्याने ठेऊ शकत नाहीत.

पण खाजगी शिकवणी मध्येही सर्वच विद्यार्थी जात असतील तर तेथेही शिक्षकाचे लक्ष राहणार नाही. परिणामी खाजगी शाळेचा खर्च, खाजगी शिकवणीचा खर्च वाया जातो कारण खाजगी शाळेत शिकले म्हणून किंवा महागडी खाजगी शिकवणी लावली म्हणून रोजगार मिळत नाही.

सुज्ञ असलेले पालक शिक्षणानंतर रोजगार मिळायला पाहिजे अशा बाबींवर तर खर्चच करताना दिसत नाहीत. म्हणून तर एवढी मोठी बेरोजगारी दिसून येत आहे.

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव, ता. मेहकर**
**९१३०९७९३००**

सरकार शासकीय नोकर भरती करत नाही हे बरोबर असले तरीही उदरनिर्वाह करण्यासाठी आपल्याला काम करावे लागणार आहेच. खाजगीकरणामध्ये रोजगार उपलब्ध आहे तरीही बेरोजगारीचे प्रमाण जास्त आहे. याचे कारण आपण रोजगार मिळवण्यासाठी किंवा उद्योग करण्यासाठी शिकलोच नाही.

आपण शिकलो फक्त सरासरी नोकरीची वाट बघण्यासाठी आणि सरकारने नोकर भरती कमी केली. सरकारने नोकर भरती कमी केली म्हणून उपाशी मरायचे का? याचा विचार पालकांनी आपल्या मुलांवर खर्च करताना केला पाहिजे.

शालेय गुणवत्तेला कुठेही फारसे महत्त्व राहिले नाही. सर्वसाधारण विद्यार्थी ऐंशीटक्के पेक्षा जास्त गुण घेत आहेत. मग फक्त देखावा करण्यासाठी माझा मुला माझी मुलगी अमुक शाळेत आहे तमुक शाळेत आहे फि एवढी आहे. हा मोठेपणा नाही तर स्वतः हाताने स्वतःच्या मुलांना अधोगती कडे जाणारा रस्ता आहे आणि ज्यांना कळत नाही तो पालक जागृत कसा?

खाजगी शिकवणी लावतांना शिक्षक जास्त फी आकारतो म्हणून क्लास लावायचे नसतात. महाग क्लास लावले म्हणजे स्टेटस वाढते असे मुळीच नाही. पण क्लास लावताना शिक्षक ओळखिचा पाहिजे, त्याचे विचार व संस्कार माहिती पाहिजे.

जाहिरात बघुन नाही तर शिक्षकाचे गुण बघून क्लास लावायला पाहिजे. मोठमोठे होर्डिंग, जाहिराती फक्त लोकांना भुलविण्यासाठी असतात ही बाब आजही लक्षात येत नसेल तर आपण सुज्ञ व जागृत पालक नाही. म्हणून डोळस वृत्ती ने गरज असेल तरच क्लास लावावा. इतर लावतात म्हणून आपणही लाऊ नये.

मुलांवर अतिरिक्त भार देण्याऐवजी मानवतेचे संस्कार द्यावे, गावातील सरकारी शाळा समृद्ध होण्यासाठी हातभार लावावा. प्रत्येक गावात प्रत्येक धर्माचे धार्मिक स्थळ आकर्षक इमारतीमध्ये उभे आहे पण शाळेची अवस्था बघून गावाला धार्मिक स्थळाची गरज आहे की शाळेची गरज आहे हे जर पालकांना कळत नसेल तर आपण सुज्ञ व जागृत पालक नाही. सुज्ञ व जागृत पालक होण्याचा प्रयत्न करूया, मुलांना रोजगारभिमुख शिक्षण देऊया... हे सुज्ञ पालकांचे लक्षण आहे.

■ ■ ■

# या हिरव्या भाजीचे फायदे ऐकून आश्चर्यचकित व्हाल



आपण बऱ्याचदा भाज्यांमध्ये, भातासोबत किंवा नूडल्ससोबत किंवा सॅलडमध्ये हिरवी सिमला मिरचीचा समावेश करतो. पण ही छोटी हिरवी भाजी तुमच्या जेवणाचे स्वरूपच वाढवत नाही तर शरीरासाठी अनेक प्रकारे खूप फायदेशीर आहे?

त्यात असे पोषक घटक असतात जे शरीराला आतून बळकट करतात आणि अनेक रोगांपासून वाचवतात. हिरव्या सिमला मिरचीमध्ये व्हिटॅमिन सीचे प्रमाण जास्त असते, जे आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास मदत करते. त्याचे सेवन केल्याने शरीर संसर्गाशी अधिक चांगल्या प्रकारे लढण्यास सक्षम होते. तसेच, ते त्वचा तरुण ठेवण्यासाठी आणि पेशी दुरुस्त करण्यासाठी उपयुक्त आहे.

अनेकजण वारंवार आजारी पडतात त्यांच्यासाठी ते नैसर्गिक रोगप्रतिकारक शक्ती वाढवणारे म्हणून काम करू शकते. या भाजीमध्ये भरपूर फायबर असते, जे पचनसंस्थेसाठी चांगले असते. ते पोट स्वच्छ ठेवते आणि बद्धकोष्ठतासारख्या समस्यांपासून आराम देते. फायबरयुक्त अन्न केवळ पोटासाठी चांगले नसते, तर ते तुम्हाला जास्त वेळ भूक लागत नाही, ज्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते. मधुमेहासारख्या आजारांनी ग्रस्त असलेल्यांसाठीही हिरवी सिमला मिरची खूप फायदेशीर ठरू शकते.

सिमला मिरचीमध्ये असलेले विशेष घटक रक्तातील साखरेची पातळी संतुलित ठेवण्यास मदत करतात. तसेच, ते शरीरात साखर शोषण्याची प्रक्रिया मंदावते, ज्यामुळे इन्सुलिनची पातळी चांगली राहते. हृदयाच्या आरोग्यासाठी देखील हा एक उत्तम पर्याय आहे. त्यात पोटॅशियम आणि अँटीऑक्सिडंट्स सारखे पोषक घटक असतात, जे रक्तदाब नियंत्रित करण्यास आणि हृदय निरोगी ठेवण्यास मदत करतात. त्याचे नियमित सेवन केल्याने हृदयाशी संबंधित समस्यांचा धोका कमी होतो. हिरवी सिमला मिरची डोळ्यांसाठी देखील फायदेशीर मानली जाते. त्यात ल्युटीन आणि झेक्सॅन्थिनसारखे घटक असतात, जे डोळ्यांना कमकुवत होण्यापासून रोखतात आणि मोतीबिंदूसारख्या वयाशी संबंधित समस्यांपासून संरक्षण देतात.

तुम्ही ते भाजीमध्ये शिजवू शकता, सॅलडमध्ये कच्चे खाऊ शकता किंवा सूप आणि स्टाई-फ्राईजमध्ये वापरू शकता. तुम्हाला हवे असल्यास, ते भरलेल्या भाजी म्हणून किंवा पराठ्यांमध्ये देखील वापरले जाऊ शकते.

**शिमला मिर्ची खाण्याचे तोटे :**
काही लोकांना शिमला मिरची खाल्ल्यावर ॲलर्जी होऊ शकते, जसे की त्वचेला खाज सुटणे, पुरळ येणे किंवा श्वास घेण्यास त्रास होणे.
काही लोकांना शिमला मिरची पचायला जड जाते, ज्यामुळे पोटदुखी, गॅस किंवा अपचन होऊ शकते.

■ ■ ■

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### घार फिरते आकाशी..!

जन्मजात हाडवैर असणारे
एकमेकांचे मित्र बनती
सत्तेच्या मोहापायीच
भाऊ भाऊ वैरी बनती..

सत्तेच्या लालसेपायीच
होते पक्षांचे गठबंधन
नाही बसला मेळ तर
प्रसंगी होते धृवीकरण..!

निमित्ताला कारण
काहीतरी सांगावे लागते
मतदार ओळखुन आहे
बरं पाणी कुठे मुरते ?..

## महानगरपालिकेची डासोत्पती स्थाने तपासणी मोहिम

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ८ जुलै :** मनपा आरोग्य विभागामार्फत संभाव्य डेंग्यु व इतर कीटकजन्य रोगांच्या प्रतिबंधासाठी डासोत्पत्ती स्थाने तपासणी मोहीम राबविण्यात येत असुन या अंतर्गत आरोग्य चमु शहरातल्या प्रत्येक घरांची तपासणी करणार असल्याने घरी येणाऱ्या ब्रिडींग चेकर्सना सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. पावसाळा सुरु होताच डेंग्यु व इतर कीटकजन्य रोगांचा प्रसार होण्यास सुरवात होते. पावसात मोकळे भूखंड, बंद घराची छते, चालु बांधकामाची ठिकाणे, घरी वापर नसलेली ठिकाणे तपासणी करणार.

## भजन स्पर्धेचे प्रमाणपत्र वाटप

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ८ जुलै :** विश्वकर्मी कॉलनी गजानन महाराज मंदिर येथे सावित्रीबाई फुले गुरुदेव सेवा भजन मंडळाद्वारे घेण्यात आलेल्या स्पर्धेचे प्रमाणपत्र वाटप कार्यक्रम नुकताच संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी श्री क्षेत्र गुरुकुंज आश्रम मोजरीचे केंद्रिय प्रतिनिधी ह.भ.प ढवस महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत सायंकाळी ५ वाजता संपन्न झाला. यावेळी महाराजांनी वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जीवनावर व कार्यावर प्रकाश टाकला तसेच सामदायिक प्रार्थना करण्यात आली. रवींद्र शेंदूरकर नलिनीताई निखाडे, माजी नगरसेविका वंदना तिखे यांनी मार्गदर्शन केले.

### आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पाठपुराव्यानंतर

# मुल बस आगारासाठी महत्त्वपूर्ण बैठक

## सातत्यपूर्ण प्रयत्नांना मिळाले यश, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले सकारात्मक निर्देश

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**मूल, दि. ८ जुलै :** मुंबई : राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर चंद्रपूर जिल्ह्यातील मुल शहरात मंजूर करण्यात आलेल्या बस आगाराच्या कामाला गती मिळाली आहे. सोमवार ७ जुलै २०२५ रोजी विधानभवन, मुंबई येथे परिवहन मंत्री मा. प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीला आमदार आ. सुधीर मुनगंटीवार यांची प्रमुख



उपस्थिती होती.


मुल शहरातील मंजूर कामाला गती देण्यासाठी विधानभवन मुंबई येथे आयोजित बैठकीस डॉ.माधव कुशेकर (उपाध्यक्ष व्यवस्थापकीय संचालक),दिनेश महाजन (जनरल मॅनेजर बांधकाम),नितीन मैंद ( व्यवस्थापक वाहतूक) आदिंची उपस्थिती होती.

बैठकीत मुल बस आगारासंबंधी रखडलेली कामे, जागेची अंमलबजावणी, कार्यान्वयनातील अडथळे आणि विभागीय समन्वय या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. मुल बस आगाराचे काम लवकर पूर्ण करण्यासाठी सबंधित विभागाला आदेश परिवहन मंत्री सरनाईक यांनी दिले.

मुल तालुक्याच्या दृष्टीने ही बैठक अत्यंत महत्त्वपूर्ण ठरली असून, आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पाठपुराव्यामुळे रखडलेल्या आगार प्रकल्पाला आता प्रत्यक्ष गती मिळणार आहे. बल्लारपूर विधानसभेच्या सर्वांगीण विकासासाठी आ. मुनगंटीवार सातत्याने प्रयत्नशील आहेत, हे विशेष

# गतीरोधक वाढवित आहेत जनसंताप

## सुविधा पुरवील ती शासकीय यंत्रणाच कसली



**रोखठोक**
**प्रा.महेश पानसे**

जनतेच्या कित्येक मागण्या लेखी, तोंडी, वर्तमानपत्रांतून शासनाच्या विविध विभागांपुढे ठेवल्या जातात. मूलशहर वासियांनी तर चक्क ' समस्या मूल शहराच्या' असा गृप बनवून यात विविध विभागांच्या अधिकारी व कर्मचारी यांना सामील करून घेतले.

अनेक सार्वजनीक समस्या, मागण्या जन मुखातून बोलक्या करणे, यंत्रणेला सजग करणे हा उद्धेश. मात्र बहुतांशी ठोस मागण्यांची दखल मूल तालुक्यातील शासकीय यंत्रणेने घेतली असेल तर नवल किंबहुना मागणी करून सुविधा पुरविल वा लक्ष देईल ती यंत्रणाच कसली? असा संतप्त सवाल आता उपस्थित होऊ लागला आहे.

मूल शहरातून धावणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावर अनेक ठिकाणी आवश्यक ' गतीरोधक' लावण्याची गंभीर मागणी सर्व स्तरातून कित्येक महिन्यांपासून सुरू आहे.

सा. बा. विभागाला याकडे लक्ष द्यायला फुरसत दिसत नाही किंवा या विभाग, उपविभागीय कार्यालयाला आमदार, खासदारानी आम्ही सांगितल्याशिवाय कामे न करण्याची तंबी दिली काय अशीही विचारणा होताना दिसते. ठेकेदारांच्या कामांवर इकडून तिकडे पळताना ज्या मूल शहरातून धावणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावर सा. बा. विभागाची मंडळी येरझारा मारते त्या मार्गावरीलगतीरोधक समस्या किती जीवघेणी आहे हे त्यांना कळू नये यावर नवल व्यक्त-होताना दिसते.

कुणाचा जीव गेल्यावरच हे दखल घेतील काय? हा गरम सवाल कायम आहेच.मूल उप विभागातील (सा.बा.) एका अधिकाऱ्यांना अंतॅगत रस्ता उंची वाढविण्याबाबत छेडले असता ( ऑफ द रेकॉर्ड) हे आमदार म्हणतील तर होऊ शकेल असे उत्तर मिळते याचा अर्थ आताहरेक समस्या आमदारांकडेच त्यांच्या पिलांटू मार्फत न्यायची काय? किंवा आमदारांची इच्छा नसेल तर ती समस्या कायम राहील काय? असे संतापजनक सवाल उपस्थित होताना दिसतात.

**आमदारांनी तरी लक्ष द्यावे.**

मूल शहरातून धावणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावरील अनेक आवश्यक गतीरोधकांचा सवाल गंभीर आहे. मूल शहरात या राष्ट्रीय महामार्गावर आवश्यक ठिकाणी गतीरोधक लावण्याची मागणी जनता, अनेक संघटना, विद्यार्थी, पालक, वाहनधारक यांची आहे व गत अनेक महिन्यांपासून सुरू आहे.

जिल्हयात शासनाची रस्ते सुरक्षा समिती आहे. यात मूल-बल्लारपूर विधानसभा आमदार सुधीरभाऊ मुंगंटीवार हे सुद्धा आहेत.

त्यांना या राष्ट्रीय महामार्गावरील गतीरोधकाची निकड अवगत असेलच. जर यावरील गतीरोधकांसाठी आमदारांच्या शिफारशीची गरज असेल तर दस्तुरखुद्द आमदारांनी या गंभीर मागणीची दखल घ्यावी ही जनतेची अपेक्षा आहे.

## पीएमश्री घुग्घुस कन्या शाळेच्या शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी सोनूताई कामतवार



**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घूस, दि. ८ जुलै :** पीएमश्री शाळेच्या व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी सोनूताई कामतवार यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा सोनूताई कामतवार यांच्या अध्यक्षतेखाली २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील पहिली पालक सभा आयोजित करण्यात आली. या सभेत विविध समित्या गठीत करण्यात आल्या.

२०२५-२६ ते २०२६-२७ या दोन वर्षाच्या कार्यकाळासाठी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी सोनुताई कामतवार , उपाध्यक्षपदी प्रणाली ब्राह्मणे, विद्यार्थी प्रतिनिधी ईश्वरी अडबाले, सचिवपदी शाळेच्या मुख्याध्यापिका मनीषा कामडे, शिक्षक प्रमुख रोशन काळे, शिक्षणप्रेमी वर्षा राखुंडे यांची निवड करण्यात आली.तसेच सोनाली कटारे, दुर्गा पचारे, रंजना अडबाले, सोनी खेडेकर,वेणूताई मडकाम, रेखा आत्राम यांची सदस्य म्हणून आणि हरिदास जुनारकर यांची पालक प्रतिनिधी म्हणून निवड करण्यात आली. त्याचप्रमाणे सखी सावित्री समिती, महिला तक्रार निवारण समिती अंतर्गत तक्रार समिती, विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा विकसन समिती स्थापन करण्यात आली. नूतन अध्यक्षा कामतवार यांनी सर्वांच्या सहकार्याने शाळेच्या विकासासाठी आदर्शवत काम करूया असे सांगितले. सहाय्यक शिक्षिका शामला तरवटकर यांनी सूत्रसंचालन केले. मुख्याध्यापिका मनिषा कामडे यांनी प्रास्ताविक केले.

# युवकांचे आयुष्य उध्वस्त करणाऱ्या ऑनलाइन गेमिंगविरोधात कठोर कायदा तयार करा - आ. किशोर जोरगेवार

## अधिवेशनात बोलतांना केली मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ८ जुलै :** संपूर्ण देशात आणि महाराष्ट्रात ऑनलाइन गेमिंग ॲपमुळे आत्महत्यांचे अनेक प्रकार समोर आले असून, अनेक गुन्हे देखील नोंदवले गेले आहेत. मात्र राज्य सरकारच्या आकडेवारीनुसार केवळ ९७ गुन्हे दाखल झाल्याचे उघड झाले आहे. ही संख्या प्रत्यक्षात अत्यंत कमी असल्याचे सांगत युवा पिढीला जुगाराची सवय लावणाऱ्या ऑनलाइन गेमिंग ॲप्सविरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी अधिवेशनात बोलताना आमदार किशोर जोरगेवार यांनी केली आहे.



सभागृहात या विषयावर प्रश्न उपस्थित करताना आमदार किशोर जोरगेवार म्हणाले की, 'जंगली रमी', 'ड्रीम इलेव्हन', 'एमपीएल', 'माय इलेव्हन सर्कल', 'वन एसबीटी' या कंपन्या टीव्हीवर जाहिराती देत असून युवकांना जुगाराच्या सवयी लावून त्यांचे आयुष्य उद्धवस्त करत आहेत. नामवंत सेलिब्रिटी अशा कंपन्यांच्या जाहिराती करतात, हे दुर्दैवी असल्याचेही त्यांनी सांगितले.

या संदर्भात राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी उत्तर देताना स्पष्ट केले की, सध्या या प्रकारासाठी कोणताही विशिष्ट कायदा अस्तित्वात नाही. यावर आमदार जोरगेवार यांनी राज्य सरकारने स्वतंत्र कायदा तयार करावा, अशी मागणी केली.

राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी उत्तर देताना सांगितले की, सध्या या विषयावर ठोस कायदा नसला तरी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांनी केंद्र सरकारला पत्र लिहून माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार या विषयावर नियमावली तयार करण्याची विनंती केली आहे. तसेच राज्य सरकारदेखील आपल्या सूचना केंद्राला देणार असल्याचेही त्यांनी सांगितले. या प्रसंगी आमदार किशोर जोरगेवार यांनी अशा कायद्यात 'धनशोधन निवारण अट' समाविष्ट करावी आणि अशा ऑनलाइन गेमिंग प्लॅटफॉर्मवर कठोर कारवाई करण्यासाठी स्पष्ट नियम तयार करण्यात यावेत, अशी सरकारकडे मागणी केली आहे.

## आषाढी एकादशी निमित्त घुग्घूस ते वढा पायदळ वारी



**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घूस, दि. ८ जुलै :** देवशयनी आषाढी एकादशी निमित्त समस्त गावकरी मंडळी व तेली समाज बहुउद्देशीय संस्था घुग्घूस यांच्या वतीने गांधी चौकशी घुग्घूस येथून दिनांक ६ जुलै रोजी सकाळी नऊ वाजता वारी विदर्भाची काशी तीर्थक्षेत्र वढा करीता भजन मंडळ टाळ मृदूंग व विठ्ठल नामाच्या गजरात निघाली

सदर वारीचे विठ्ठल माऊली ज्वेलर्स समोर आ.किशोर जोरगेवार यांच्या मार्गदर्शनात आशीष मासिरकर यांच्या वतीने स्वागत करण्यात आले व वारकऱ्या करीता कॉफी पाण्याची व्यवस्था करण्यात आली. याप्रसंगी भाजप नेते आशिष मासिरकर,माजी.सरपंच संतोष नुने,स्वप्नील वाढई, सुचिता लुटे,सुनिता पाटील, दिलीप खांडारकर व अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

# आदिवासी समाजाचे दैवत भंडारा देवीची विटंबना करणाऱ्यांवर कारवाई करा

## आदिवासी एकता संघटनेचे तहसीलदारांना निवेदन सादर

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**भद्रावती, दि. ८ जुलै :** मौजा बेलोरा गावातील अरबिंदो कोलमाईन्सच्या लीज एरीयात गोंडीयन आदिवासी समाजाचे पुरातन भंडारा देवी स्थापीत होती. समाजातर्फे अरबिंदो कंपणीच्या पुनर्वसन कमेटीला विश्वासात घेऊन या मुर्तीला लिज एरीयाच्या बाहेर अन्यत्र विधीवत स्थापण करण्यात आले.मात्र काही बाहेरील लोकांनी परत त्या मुर्तीला उचलून जुन्या लीज एरीयामधे स्थापण केले.यामुळे देविची विटंबना झाली



असुन गोंडी धर्मीयांच्या भावना दुखावल्या गेल्या आहे.त्यामुळे या प्रकाराची चौकशी करुन दोषींवर कारवाई करावी व समाजाला न्याय द्यावा अन्यथा याविरोधात समाजाच्या वतीने तिव्र आंदोलन छेडण्यात येइल असा इशारा गोंडी धर्मीय आदिवासी एकता संघटनेच्या वतिने तहसीलदारांना सादर करण्यात आलेल्या निवेदनातून देण्यात आला आहे. यावेळी गोलू गेडाम,प्रमोद गेडाम,संदीप कुमरे,पिंटू मरसकोल्हे, महादेव सिडाम,संदीप नैताम,निरंजन आत्राम,बंडू कोडापे,प्रभाकर कुळमेथे आदी ऊपस्थीत होते.

## अज्ञात इसमाचा मृतदेह रेल्वे रुळावर आढळला

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**भद्रावती, दि. ८ जुलै :** २८ मे २०२५ ला एका अज्ञात इसमाने रेल्वे रुळावर कटून मृत्यू पावल्याची घटना घडली असून भद्रावती पोलिसात अज्ञात इसमाविरुद्ध मर्ग दाखल करण्यात आला आहे.

राहुल पांडुरंग गोरुडे पोइसमेन , भांदक रेल्वे यांनी होम सिग्नल बाहेर पोल ना ८५१ बी -१६जवळ एक इसम वय ३० वर्ष रेल्वेने कटून मृत्यू पावल्याची यांनी भद्रावती पोलिसात रिपोर्ट दिली. पोलिसांनी ४०/२०२५ कलम १९४ बी एन एस एस दाखल केला आहे. सदर अज्ञात इसम हा पिवळ्या रंगाचा बाह्यांचा शर्ट व निळ्या रंगाचा जीन्स पॅन्ट घातलेला असून बांधा सळपातळ , उंची ५.२ फूट, रंग सावळा , उजव्या हातावर हार्ट चे चिन्ह आहे.

या नमूद वर्णाचे इसमाबाबत काही माहिती असल्यास भद्रावती पोलिसात ८७८८५८४५६८, ९७६४३२५४९३ या क्र वर संपर्क साधण्याचे आवाहन भद्रावती पोलिसांनी केले आहे. पुढील तपास भद्रावती पोलीस करीत आहे.

## नुकत्याच बांधलेल्या ६० लाखांच्या सिमेंट कांक्रीट रोडला पडले खड्डे, भ्रष्टाचाराचा आरोप

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ८ जुलै :** चंद्रपूर शहरातील तुकूम प्रभाग क्रमांक १ मध्ये शिवाजी महाराज चौक ते वाघोबा चौक ते दत्तनगर भुषण पाटील यांच्या घरापर्यंत ६० लक्ष रुपये सिमेंट कॉंक्रीट रोड बनविण्यात आला आहे. या रोडचे बांधकाम कंत्राटदाराकडून नित्कृष्ठ दर्जाचे असून रस्त्यावर पावसाच्या सुरुवातीलाच खड्डा पडलेला दिसुन येतो. रस्त्यावरुन सिमेंट वाहुन गेलेले आहे व गिट्टी ही स्पष्टपणे दिसुन येत आहे. याचाच अर्थ



असा की, कंत्राटदाराने ते काम हे नित्कृष्ठ दर्जाचे केलेले आहे. तसेच कंत्राटदाराकडून महाराष्ट्र शसन परिपत्रक दि. ८ जून २००९ च्या परिपत्रकाचे उलुंघन झाल्याचे दिसुन येते.

तुकूम येथील निकृष्ट सिमेंट कांक्रीट रस्त्याच्या कामाची चौकशी करुन कंत्राटदारावर कार्यवाही करुन काळ्या यादीत टाकावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते चंद्रकिशोर यादव यांनी महानगरपालिकेचे आयुक्त पालीवाल यांना तक्रारीतून केली आहे.

# चिमूर विधानसभा क्षेत्रात शेतकऱ्यांसाठी ड्रोन तंत्रज्ञानाचे उद्घाटन ठरणार शेतीतील क्रांतीची नवी दिशा

## सलाम किसान आणि घनश्यामजी पिसे कृषी संशोधन केंद्राचा संयुक्त उपक्रम

**महासागर प्रतिनिधी**

**नेरी, दि. ८ जुलै :** शेतीतील आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ चिमूर विधानसभा क्षेत्रातील शेतकऱ्यांना मिळावा या उद्देशाने ड्रोन सेवा आता चिमूर विधानसभेतील सर्व गावांमध्ये उपलब्ध करण्यात आली आहे. नेरी येथे बाजार चौकात प्रा. डॉ. अजय पिसे यांच्या हस्ते या ड्रोन सेवांचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी सलाम किसानचे विदर्भ प्रतिनिधी सुमित मुंगले यांनी शेतकऱ्यांना ड्रोन तंत्रज्ञानाविषयी सविस्तर माहिती दिली.



शेतकऱ्यांना सध्या कामगाराच्या कमतरतेमुळे शेतीसंबंधी अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. विशेषतः कीटकनाशक फवारणीसारख्या अत्यावश्यक कामांमध्ये उशीर होतो आणि त्यामुळे पीक नुकसान होण्याचा धोका वाढतो. ड्रोनच्या वापरामुळे ही समस्या दूर होणार आहे.

प्रा. डॉ. अजय पिसे यांनी सांगितले की, 'ड्रोन तंत्रज्ञानामुळे शेतकऱ्यांचा वेळ, पैसा आणि मेहनत वाचेल तसेच उत्पादन खर्च कमी होऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल. या तंत्रज्ञानामुळे परिसरातील बेरोजगार युवकांसाठीही नवे रोजगार निर्माण होतील. शेतकऱ्यांनी शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करणे अत्यंत गरजेचे आहे.'

'सलाम किसान' व 'घनश्यामजी पिसे कृषी संशोधन केंद्र' यांच्या संयुक्त विद्यमाने चिमूर विधानसभा क्षेत्रात शेतकऱ्यांसाठी ही ड्रोन सेवा सुरू करण्यात आली आहे. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी आमच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. उद्घाटन प्रसंगी घनश्याम पिसे, सुमित मुंगले, विलास दिघोरे, रितेश पिसे, संजय मेश्राम, दिवाकर पिसे, आदित्य पिसे उपस्थित होते. हे सर्व सदस्य शेतकऱ्यांमध्ये ड्रोन तंत्रज्ञानाची जाणीव व जनजागृती करण्यासाठी विशेष प्रयत्न करीत आहेत.

## माथोली, जुगाद गाव आषाढी एकादशीनिमित्त वारकऱ्यांच्या भक्तीने दुमदुमले



**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घुस, दि. ८ जुलै :** आषाढी एकादशीनिमित्त ६ जुलै २०२५ रविवार सकाळ रोजी कैलाश नगर येथे वारीचे आयोजन करण्यात आले.

या वारीत कैलाश नगर शिव मंदिर ते यवतमाळ जिल्ह्यातील प्रसिद्ध हेमाडपंथी काळातील शिव मंदिर जुगाद विठ्ठल,रुक्मिणीच्या पालखीची मिरवणूक काढण्यात आली.

या वारीत टाकळी येथील भजन मंडळ व कैलाश नगर,जुगाद, माथोली, चिखली, सावंगी येथील सर्व भजन मंडळ व भक्तजन एकत्रित येऊन हि वारी माथोली, कैलाश नगर,साखरा ते जुगाद पायदळ वारी काढण्यात आली होती.

तसेच काढलेली वारी अतिशय आनंदाने पार पडली, परिसरातील नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला व महिलांच्या मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते.

विठू माऊलींच्या दर्शना सोबतच महादेवाचे दर्शन ही करण्यात आले व शिवमंदिर येथे भजन ही झाले व पालखी सोहळा पूजास्थान करून समारंभ करण्यात आले.

RNI No.49746/1988 चंद्रपूर महासागर

मालक, मुद्रक, प्रकाशक सौ. निर्मला चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापुन दैनिक चंद्रपूर महासागर कार्यालय, पोपट बिल्डींग जटपुरा गेट, चंद्रपूर येथे प्रकाशित केले. संपादक राहुल चांडक

मुख्य कार्यालय फोन - ७४४७७३५८५१, ९९२२९७००२३ ※ स्थानिक संपादक :- प्रवीण बतकी ※ (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

## मर्सिडिज खोके, एकदम ओके
## शिंदे गटाच्या नीलम गोऱ्हेंनी वटारले डोळे




■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :

राज्य मंत्रिमंडळाचे पावसाळी अधिवेशन विधान भवनात सुरू आहे. यावेळी विरोधी पक्षांचे नेते विधानभवनाच्या पायऱ्यांवर बसून घोषणाबाजी करत होते. यावेळी शिवसेना शिंदे गटाच्या नेत्या व उपसभापती नीलम गोऱ्हे या विधानभवनात आल्या तेव्हा आदित्य ठाकरे यांनी 'मर्सिडीज खोके, एकदम ओके', अशा घोषणा देण्यास सुरू केले. तेव्हा नीलम गो?हे यांनी आदित्य ठाकरे यांच्याकडे चिडून पाहिले. याचा व्हिडिओ देखील चांगलाच व्हायरल होत आहे.



### विधीमंडळ अधिवेशन

सभागृहात बोलताना विरोधकांनी सरकारला अनेक मुद्यांवरून घेरले आहे. तसेच सभागृहाच्या बाहेर देखील घोषणाबाजी देत सत्ताधाऱ्यांची चांगलीच मजा घेणे सुरू असल्याचे दिसून येत आहे. आदित्य ठाकरे यांनी नीलम गोऱ्हे यांना पाहताच 'मर्सिडीज खोके एकदम ओके', अशी घोषणा दिली. ही घोषणा ऐकताच नीलम गोऱ्हे संतापल्या. पायऱ्या चढून वर गेल्यावर त्यांनी आदित्य ठाकरे यांच्याकडे रागाने पाहिले.

शिवसेना ठाकरे गटाचे नेते भास्कर जाधव यांनी देखील मंत्री भरत गोगावले यांना पाहताच 'ॐ फट स्वाहा', अशा घोषणा देणे सुरू केले होते. एकंदरीतच विरोधकांनी सभागृहात आणि सभागृहाच्या बाहेर सत्ताधाऱ्यांकडून चांगलीच मजा घेणे सुरू असल्याचे दिसत आहे.

नीलम गोऱ्हे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका करताना पद मिळवायचे असेल तर मर्सिडीज द्यावी लागते, असा आरोप केला होता. त्याच्या पार्श्वभूमीवर आदित्य ठाकरे यांनी 'मर्सिडीज ओके' अशी घोषणा दिली.

शिवसेनेच्या प्रत्येक कार्यक्रमासाठी ठाण्यातून माणसे आणली जायची. गल्ला गोळा करण्याचे काम एकनाथ शिंदेंना दिले होते, असेही त्यांनी काही महिन्यांपूर्वी एका मुलाखतीत म्हटले होते.

# पूर्व विदर्भात संततधार

**वैनगंगा नदीने ओलांडली धोक्याची पातळी : अतिवृष्टीमुळे ७२ घरांचे अंशतः नुकसान : गोसीखुर्द धरणाचे ३३ दरवाजे उघडले**

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८ :

पूर्व विदर्भातील भंडारा, नागपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात पावसाचा कहर सुरू असून, वैनगंगा नदीसह इतर अनेक नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली आहे. संततधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून, अनेक मार्ग बंद करण्यात आले आहेत.

भंडारा जिल्ह्यातील वैनगंगा नदीने मंगळवारी धोका पातळी ओलांडली आहे. कारधा पुल (जुना) येथे वैनगंगा नदीची इशारा पातळी ही २४५ मीटर आणि धोका पातळी २४५.५६ मीटर आहे. मंगळवारी सकाळी ८ वाजता वैनगंगा नदीची इशारा गाठली.



जिल्ह्यातील सातही मंडळात एकूण ३८ गावात अतिवृष्टी झाली असून नैसर्गिक आपत्तीने जिल्ह्यातील ७२ घरांचे अंशतः तर दोन घरांचे पुर्णतः नुकसान झाले आहे. सद्यःस्थितीत भंडारा जिल्ह्याला ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून पुराचे पाणी व इतर साथीचे रोग बळावण्याची शक्यता असते. त्यामुळे नागरिकांनी खबरदारी घ्यावी, असे आवाहन प्रशासनामार्फत करण्यात आले आहे. जिल्ह्याच्या लाखांदूर तालुक्यात सर्वाधिक १६४.७० मिमी पावसाची नोंद झाली असून त्याखालोखाल पवनी तालुक्यात १५५.१० मिमी पावसाची नोंद झाली.

भंडारा जिल्ह्यात मागील तीन दिवसांपासून संततधार पाऊस सुरू आहे. त्यामुळे ग्रामीण भागात नदी, नाले दुथडी भरून वाहत आहेत. गोसीखुर्द धरणाच्या पाणलोट क्षेत्रात देखील चांगला पाऊस बरसल्याने सर्व ३३ दरवाजे १.५० मीटरने उघडले आहेत. सध्या धरणातून १११९७.६६ क्युसेक पाण्याच्या विसर्ग सुरू आहे. त्यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

जिल्ह्यात रविवार रात्रीपासून सतत तीन दिवस धो-धो बरसणाऱ्या पावसामुळे भंडारा शहराजवळील वैनगंगा नदीच्या पातळीत वाढ झाली आहे. जिल्ह्यातील १५ रस्ते बंद झाले असून तुमसर ते बालाघाट आंतरराज्यीय मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे.



**गडचिरोलीत पुराचा कहर**

दोन दिवसांपासून सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळे गडचिरोली जिल्ह्यातील जनजीवन विस्कळीत झाले असून पूर आल्याने १६ मार्ग बंद झाले आहे. उत्तर गडचिरोलीतील देसाईगंज उपविभागाला पावसाचा सर्वाधिक तडाका बसला आहे. बहुतांश नद्या दुथडी भरून वाहत असल्याने इशारा पातळीजवळ पोहोचल्या असून नदी काठावरील गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

जुलैच्या पहिल्याच आठवड्यात पडलेल्या मुसळधार पावसामुळे सर्वत्र पूरस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे देसाईगंज, कुरखेडा उपविभागातील १६ मार्गावरील रहदारी बंद झाली आहे. सोमवार रात्रीपासून मुसळधार पाऊस सुरू असल्याने पूरस्थिती आणखी बिकट होण्याची चिन्हे आहे.

सोबतच गोसेखुर्द धरणातून पाण्याचा विसर्ग वाढवण्यात आल्याने जिल्ह्यातील मुख्य वैनगंगा नदीच्या पातळीत वाढ होत आहे. त्यामुळे आणखी काही मार्ग बंद होऊ शकतात. तर काही नद्या इशारा पातळीच्याजवळ पोहोचल्या आहे.

खबरदारी म्हणून जिल्हा व राज्य आपत्ती व्यवस्थापनाच्या चमूला तयारीची सूचना देण्यात आली आहे. पावसाचा सर्वाधिक तडाखा कुरखेडा तालुक्याला बसलेला आहे. येंगलखेडा लघु सिंचन प्रकल्प देखील भरल्याने विसर्ग वाढविण्यात आला आहे. यामुळे नदीकाठावरील गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी बैठक घेत पूरस्थितीचा आढावा घेतला असून आपत्ती निवारणासाठी प्रशासनाला सूचना केल्या आहे.

जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी नागरिकांना घाबरू नका, पण सतर्क राहा असे आवाहन करत नदीकाठच्या गावांमध्ये सतर्कतेची उपाययोजना राबविण्याचे आदेश आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेला दिले आहेत. पूलावरून पाणी वाहत असल्यास तिथे मोटारसायकलने जाणे अत्यंत धोकादायक आहे. नागरिकांनी अशा ठिकाणी जाऊ नये, तसेच नदी प्रवाह पाहण्यासाठी पर्यटन व सेल्फी घेण्याचे प्रकार पूर्णतः टाळण्याचेही आवाहनही त्यांनी केले आहे. पोलीस विभागाने धोकादायक भागांमध्ये बॅरिकेटिंग करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

कुरखेडा मालेवाडा रस्ता राज्यमार्ग ३६२ (खोब्रागडी नदी), कोरची बोटेकसा भीमपूर रस्ता राज्यमार्ग ३१४ (भीमपूर नाला), कुरखेडा वैरागड रस्ता राज्यमार्ग ३७७ यासह अनेक मार्ग बंद झाले आहेत.

इकडे नागपूर शहरासह जिल्ह्यात सर्वत्र पावसाने धुमाकूळ घातला असून, शहरातील बाजारपेठा ओस पडल्याचे दिसून आले. बाहेगावी जाणाऱ्या बसफेऱ्यांवरही पावसाचा परिणाम झाला आहे. नागपूर शहराच्या अनेक भागात पाणी साचल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

## देवस्थानच्या जमिनींवरील आरक्षणे रद्द करणार

### उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली ग्वाही



पिंपरी-चिंचवड शहराचा प्रारुप विकास आराखडा अंतिम करताना कोणत्याही भूमिपुत्रावर अन्याय होणार नाही. गोरगरिबांची घरे बाधित होणार नाहीत. देवस्थानच्या जमिनींवर पडलेल्या आरक्षणांची तपासणी करुन रद्द केली जातील, असे आश्वासन उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आज सभागृहात दिले.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि नगर रचना विभागाने शहराचा प्रारुप विकास आराखडा १५ मे २०२५ रोजी प्रसिद्ध केला आहे. त्यावर १४ जुलैपर्यंत हरकती व सूचना मागवण्यात आल्या आहेत. भाजपाचे आमदार महेश लांडगे व आमदार शंकर जगताप यांनी या प्रकरणी लक्षवेधी सूचना मांडली.

आमदार शंकर जगताप म्हणाले की, डीपी तयार करताना चुकीच्या पद्धतीने केला आहे. बांधकाम परवाने घेतलेल्या जमिनींवर आरक्षण टाकले आहे. पुनावळे येथील कचरा डेपोचे आरक्षण रद्द केले आणि त्या ठिकाणी कमर्शिअल कॉम्प्लेक्सचे आरक्षण टाकले आहे. एचसीएमटीआर मधील साडेतीन किलोमीटरवर लिनिअर गार्डन विकसित केले आहे.

पण, प्रारुप विकास आराखड्यामध्ये त्याचा विचार केलेला नाही. आहे तसे आरक्षण ठेवले आहे. थेरगाव येथेसुद्धा हजारो नागरिक बेघर होणार आहेत. अधिकाऱ्यांनी चुकीच्या पद्धतीने मंत्री यांना माहिती दिली. त्यामुळे मंत्री यांनी गोलगोल फिरवणारे उत्तर दिले. सभागृहाला अधिकारी चुकीची माहिती देत आहेत. बांधकाम परवागनी घेतलेले आरक्षणे रद्द करावीत.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, सध्या प्रारुप आराखडा तयार झाला आहे. त्यामध्ये सुधारणा करण्यात येतील. पण, जुन्या डीपीतील ८५० आरक्षणे नव्याने प्रस्तावित केली आहेत. जागेवर जावून आरक्षणे निश्चित करावीत. मोशी-आळंदी भागातील कत्तलखाना मुख्यमंत्र्यांनी रद्द केला. देवस्थानच्या जमिनींवर आरक्षण पडले आहे. ती आरक्षणे रद्द केली पाहिजेत. शहरातील गोरगरिबांनी अर्धा गुंठा, एक गुंठा घेवून बांधलेली घरे बाधित होता कामा नये.

या दोन्ही आमदारांच्या मागणीनंतर उद्योग मंत्री उदय सामंत यांनी या प्रकरणी योग्य ती काळजी घेण्याची ग्वाही दिली. ते म्हणाले, एमआरटीपी अधिनियम १९६६ कलम २२ अन्वये सुधारित आराखड्यामध्ये आरक्षणे प्रस्तावित केली जातात.

डीपीची कार्यवाही पूर्ण केल्यानंतर तक्रारी व सूचनांचा विचार केला जातो. त्यानंतर प्रारुप आराखडा शासनाकडे मंजुरीसाठी जातो. आराखड्यामध्ये सुधारणा करण्याचे अधिकार शासनाला आहेत. पूर्वीपासून असलेल्या देवळांवर आरक्षणे पडली असतील, तर ती तपासून घेतली जाईल.

## कामराच्या विरोधात हक्कभंग प्रस्ताव मंजूर

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ८ :



भाजप आमदार प्रवीण दरेकर यांनी स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा व शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांच्याविरोधात दाखल केलेला हक्कभंग मंजूर करण्यात आला आहे. त्यानुसार कुणाल कामराला नोटीस बजावण्यात आली आहे. यावर प्रतिक्रिया देताना कुणाल कामराने म्हटले, नोटीस बजावणे हा तुमचा अधिकार आणि विनोद करणे हा माझा अधिकार.

कुणाल कामराला समितीसमोर त्याची बाजू मांडण्याची आणि स्पष्टीकरण देण्याची संधी दिली जाईल. अहवालानुसार, कामराला फौजदारी प्रकरणांमध्ये न्यायालयाकडून दिलासा मिळाला असला तरी, विधिमंडळाच्या या कृतीमुळे त्यांच्या अडचणी आणखी वाढू शकतात.

कुणाल कामराने त्याच्या एका शोमध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर व्यंगात्मक गाणे गायले होते. त्यांची दाढी चष्मा यावरून कुणाल कामराने विडंबनात्मक गाणे गायले होते.

## निवडणुकीसाठी मराठी-हिंदी वाद

### अबू आझमींचा आरोप

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ८ :



समाजवादी पक्षाचे आमदार अबू आसिम आझमी यांनी मराठी भाषेच्या मुद्द्यावर भाष्य करत एकीकडे मराठी भाषेचा आदर आवश्यक असल्याचे सांगितले, तर दुसरीकडे काही राजकीय पक्षांकडून मराठी-हिंदी वाद मुद्दाम भडकवला जात असल्याचा आरोप केला आहे. आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

अबू आझमी म्हणाले की, मराठी ही महाराष्ट्राची अस्मिता आहे. तिचा सन्मान झाला पाहिजे. परंतु केवळ मराठी येत नाही म्हणून कोणालाही मारणे, ही प्रवृत्ती चुकीची आहे. महाराष्ट्राने देशाच्या प्रत्येक कोपऱ्यातून आलेल्या लोकांना पोटभर अन्न दिले आहे, त्यांना मोठे केले आहे. हे विसरू नये.

**हल्ले बंद व्हावे**

अबू आझमी म्हणाले की, उत्तर भारतीय असोत वा राजस्थानमधून आलेले लोक असोत, महाराष्ट्रात येऊन कष्ट करतात, प्रगती करतात. त्यांच्यावर हल्ले होणे हे अत्यंत निंदनीय आहे. अशा घटनांवर सरकारने कठोर कारवाई केली पाहिजे.

**मतांसाठी भाषावाद?**

अबू आझमी म्हणाले की, काही राजकीय पक्ष जाणूनबुजून मराठी विरुद्ध अमराठी असा वाद निर्माण करत आहेत. हे सगळे मतांसाठी सुरू आहे. मराठी माणसाच्या नावावर निवडणुकीत फायदा घेण्याचा हा प्रयत्न आहे. हे राजकारण थांबले पाहिजे. जो खरोखर मराठी माणसांचा सन्मान करतो, तो कुठल्याही परप्रांतीयाला मारहाण करणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## शेतकऱ्यांनी शेतात पेरले भाजपचे झेंडे!

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. ८ :



प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष व माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी १३८ किलोमीटरची पदयात्रा सुरू झाली आहे. देशाचे माजी कृषीमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जन्मगाव असलेल्या पापळ येथून सुरू झालेली ही पदयात्रा यवतमाळ जिल्ह्याकडे सरकत आहे. वाटेत सुकळी येथे शेतकऱ्यांनी शेतात चक्क भाजपचे झेंडे रोवून लक्ष वेधून घेतले आहे.

शेतकऱ्यांना शेती परवडत नाही. आता पेरणी बंद. आता सरकारने आमची जमीन घ्यावी, नाहीतर गांजा, अफूचे पीक घेऊ द्यावे, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.ज्या शेतामध्ये भाजपचे झेंडे रोवण्यात आले तेथे पदयात्रेदरम्यान थांबून बच्चू कडू यांनी सरकारवर टीका केली.

बच्चू कडू म्हणाले, केंद्रात, राज्यात भाजपची सत्ता आहे, जिल्हा परिषद त्यांची, महानगर पालिका त्यांची. घरांवरही भाजपचेच झेंडे होते, आता शेतातच झेंडे शिल्लक होते. शेतकऱ्यांनी शेतातही ते लावून टाकले आहेत. शेतकऱ्यांनी पीक घेतल्यापेक्षा झेंडे लावले तर काय बिघडले, आम्ही आता शेतासहीत तुमच्या पक्षात येतो. कमळ लागले की, घेऊन टाकत जा तुम्ही, असा टोला बच्चू कडू यांनी लगावला.

सुकळी येथील शेतकऱ्यांनी शेतात भाजपचे झेंडे लावून सरकारच्या विरोधात संताप व्यक्त केला आहे. शेतात लावलेले फलक देखील लक्ष वेधून घेत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्रीद्वय एकनाथ शिंदे, अजित पवार हे बैलगाडीवर बसल्याचे छायाचित्र या फलकावर आहे.

**: मुलखावेगळी माणसं :**

## सर्पमित्र निर्झरा



साप दिसला की भल्याभल्यांची बोबडी वळते. लगेच लोकांना बोलावून त्याला मारल्यावरच सुटकेचा निःश्वास सोडतात; पण एक महिला कोणाच्या घरी, शेतात, दुकानात, अंगणात साप आलाय असा केवळ निरोपाचा फोन आला की, तातडीने तेथे जाऊन त्या सापाला कोणतीही इजा होणार नाही याची काळजी घेऊन अलगद पकडून पुन्हा सुरक्षितस्थळी जंगलात सोडून देण्याचे कार्य गेल्या अनेक वर्षांपासून करत आहेत. या आहेत बेळगावातील निर्झरा चिट्ठी.

साप विषारी असो वा बिनविषारी, त्याला पकडून सुरक्षितस्थळी सोडून सापाविषयी असलेले गैरसमज दूर करण्याचे कार्य महिला सर्पमित्र निर्झरा चिट्ठी करत आहेत. बेळगावातील एकमेव महिला सर्पमित्र म्हणून त्यांची आज सर्वत्र ओळख आहे. विशेष म्हणजे त्यांचे पती आनंद चिट्ठी हेसुद्धा सर्पमित्र आहेत. पतीपासून प्रेरणा घेऊन निर्झरा यांनी साप पकडायला प्रारंभ केला.

पतीमुळेच त्यांना सापाच्या विविध जाती आणि विषारी, बिनविषारी सापांविषयी माहिती झाली. नंतर निर्झरा यांनी साप पकडायला सुरुवात केली. आतापर्यंत त्यांनी १५१० साप पकडून सुरक्षितस्थळी सोडले आहेत. निर्झरा यांचे पती आनंद यांनी आजपर्यंत पंधरा हजारांहून अधिक साप पकडून त्यांना जीवदान दिले आहे. पतीने वाचविलेल्या सापांमध्ये निर्झरा यांचाही सिंहाचा वाटा आहे.

निर्झरा यांनी स्वतः १५१० साप पकडले आहेत. मे २०१५ मध्ये एकाच दिवशी १३ साप पकडण्याचा विक्रम त्यांनी केला आहे. महिला असूनही रात्री-अपरात्री साप वाचविण्यासाठी त्या जातात. सर्प पकडणे, त्यांना सोडणे, जखमी सापावर उपचार, सर्पविषयक व्याख्यान, गंभीर सर्पदंशावेळी पतीच्या पाठीशी निर्झरा यांनी खंबीरपणे साथ दिली आहे. साप पकडण्याबरोबर प्रतिष्ठित सामाजिक संस्थांतून कार्य निर्झरा करत आहेत. त्यांना बाइक रायडिंगचा छंदही आहे. यू ट्युबवरील त्यांच्या व्हिडिओ आणि फोटोमुळे त्यांना जगभर प्रसिद्धी लाभली आहे.

महिला सर्पमित्र म्हणून देशात सर्वाधिक लोकप्रियता त्यांना मिळाली आहे. आज त्या अनेक महिला आणि तरुणींचे प्रेरणास्थान बनल्या आहेत.फिल्म इंडस्ट्री आणि मॉडेलिंगसाठीही त्यांना ऑफर्स आल्या आहेत. त्यांचा मुलगा भगतसिंग आणि मुलगी निआसा यांनादेखील त्यांनी सापांविषयी माहिती दिली असून, मुलेही उत्तमरीत्या साप हाताळतात.

**लोकमानस**

साप पकडण्यात एक टक्का रिस्क असते. आपण वाचलो तर साप वाचणार, ही भावना साप पकडताना मनात असते. नाग, मण्यार आणि घोणस हे विषारी साप पकडणे आव्हान असते. सापाला केव्हाही प्रेमाने पकडावे. घर, विहीर आणि झुडूपात साप पकडणे धोकादायक असते. कारण तेथे बचावाला जागा नसते.

वनविभाग, पर्यावरणप्रेमी, सर्प संशोधक व सरकार यांची मदत झाल्यास ९० टक्के सर्पदंशामुळे होणारे मृत्यू कमी करता येतील.असे निर्झरा यांना वाटते. खरोखरच एक स्त्री असून सापासारख्या विषारी प्राण्याला पकडून निसर्गाच्या अधिवासात सोडण्याचे कार्य करून पर्यावरण संवर्धनास मदत करणाऱ्या निर्झरा या तमाम स्त्रियांसाठी एक प्रेरणास्थानच आहेत अस नक्की म्हणता येईल.

■ ■ ■

### मराठी, अमराठी वाद हा केवळ निवडणुकांचा अजेंडा आहे का?

सुमेध पवार, समाजसेवक

सध्या हिंदी भाषेची शालेय विद्यार्थ्यांसाठी तिसरी भाषा म्हणून केलेली सक्ती आणि त्यावरून उफाळलेला मराठी अमराठी वाद हा अनेकांना राजकीय पक्षांचा निवडणुकापुरता अजेंडा वाटत असला तरी प्रत्यक्षात मला तस अजिबात वाटत नाही. प्रत्येक राज्याची स्वतःची अशी मातृभाषा असते जशी महाराष्ट्राची मायमराठी भाषा आहे. मग इथे आपली कर्मभूमी म्हणून व्यापार किंवा व्यवसाय करण्यासाठी इतर राज्यांमधून येणा?या परकीय भाषिक लोकानी मराठी भाषा शिकण यात चूक काय आहे? प्रत्येक राज्याला जसा स्वभाषेचा अभिमान आहे तसाच महाराष्ट्राला मराठीचा अभिमान असायलाच हवा. या प्रकरणाला काही नतद्रष्ट लोक राजकीय अजेंडा म्हणून बघत असतील तर हे दुर्दैव आहे.

शैला बच्छाव, कार्यकर्ता शिवसेना

जेंव्हा पासून मराठी भाषेच्या अस्मितेसाठी आणि हक्कासाठी राज आणि उद्धव ठाकरे हे दोघे बंधू एकत्र आले आहेत तेंव्हापासून महाराष्ट्रा बाहेरील तमाम अमराठी लोकांमध्ये आणि काही महाराष्ट्रातीलच सत्ताधारी पक्षांच्या लोकांकडून मराठीबद्दल द्वेषभावना पसरविण्याचे आणि मराठीला कमी लेखणायचे उद्द्योग सुरु झालेले आहेत. उत्तर भारतीय काही नेते तर बुद्धी गहाण टाकून इतके मस्तवाल झाले आहेत कि मराठी लोकांना सरळ धमक्या देऊ लागले आहेत. अर्थातच यामागे काही राजकीय पक्षांचा स्वार्थ असला तरी मराठी भाषा आणि मराठी लोकांबद्दल जर कुणी परका बरळत असेल आणि मराठीचा अपमान करत असेल तर अशाना धडा शिकवायलाच हवा असं वाटत. आणि सध्या मराठी माणूस देखील हेच करतोय.

■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com



## अर्बन क्रूझर हायराइडरसाठी टोयोटा किर्लोस्कर मोटरचे खास 'प्रेस्टीज पॅकेज'

ग्राहकांचा आनंद वाढवण्याच्या आपल्या वचनबद्धतेला बळकटी देत, टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने त्यांच्या लोकप्रिय सेल्फ-चार्जिंग हायब्रीड एसयूव्ही अर्बन क्रूझर हायराइडरसाठी मर्यादित कालावधीसाठी 'प्रेस्टीज पॅकेज' सादर केले आहे.

एसयूव्हीचे आधीच धाडसी आणि अत्याधुनिक आकर्षण वाढवण्यासाठी विचारपूर्वक डिझाइन केलेले, हे खास ॲक्सेसरी बंडल ग्राहकांना दररोजच्या ड्रायव्हिंगसाठी शैली, उपस्थिती आणि कार्यक्षमतेचा एक अतिरिक्त स्तर प्रदान करते.जुलै २०२५ पासून उपलब्ध असलेल्या प्रेस्टीज पॅकेजमध्ये १० उच्च-मूल्य, डीलर-फिटेड आणि अस्सल ॲक्सेसरीज समाविष्ट आहेत जे हायराइडरच्या मजबूत, शहरी डिझाइनला परिपूर्णपणे पूरक आहेत.

या ॲक्सेसरीज मध्ये डोअर व्हिझर - एसएस इन्सर्टसह प्रीमियम, हूड एम्बलम, मागील दरवाजाचे झाकण गार्निश, फेंडर गार्निश, बॉडी क्लेडिंग, फ्रंट बंपर गार्निश, हेड लॅम्प गार्निश, मागील बंपर गार्निश, मागील लॅम्प गार्निश -क्रोमआणि बॅक डोअर गार्निश यांचा समावेश आहे. प्रत्येक ॲक्सेसरीज हायराइडरच्या विशिष्ट एसयूव्ही कॅरेक्टरशी अखंडपणे मिसळण्यासाठी तयार करण्यात आली आहे. - तिचा मस्क्युलर स्टॅन्स, क्रोम हायलाइट्स आणि आकर्षक सिल्हूट वाढवते. ■